RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)     कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर   वर्ष ३४ वे   अंक १५६ वा सोमवार, दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक)   पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26   पृष्ठे – ६   मो:९४२२४७२५०२   किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

संपर्क

**जडे ऑफसेट प्रिंटर्स**

मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८



## सोशल मीडिया बंदीवरुन नेपाळमध्ये राडा

### तरुणाई संसदेत घुसली, आतापर्यंत ५ आंदोलकांचा मृत्यू

**काठमांडू/वृत्तसंस्था :** नेपाळमध्ये सोशल मीडियावरील बंदीवरून आक्रमक झालेल्या तरूणांनी सोमवारी सरकारविरोधात आंदोलन सुरु केले आहे. नेपाळच्या काठमांडूमध्ये संचारबंदी लागू करण्यात आलीये. नेपाळमध्ये फेसबुक, ट्विटरसह २६ सोशल मीडियावर बंदी घालण्यात आलीये. नेपाळच्या संसद परिसरात जाऊन तरूणांनी आंदोलन केलं. धक्कादायक म्हणजे ५ आंदोलनकर्त्यांचा मृत्यू झाला आहे.

नेपाळमध्ये हजारो Gen-Z मुले-मुली सरकारच्या रस्त्यावर उतरले आहेत. सोमवारी आंदोलकांनी नेपाळच्या संसदेत प्रवेश केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि पाण्याची फवारणीही केली. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहितीही समोर येत आहे. सध्याच्या परिस्थिती लक्षात घेता नेपाळ सरकारने आपत्कालीन सुरक्षा बैठक बोलावली आहे. त्याचवेळी, पोलिसांनी काठमांडूमध्ये रविवारी रात्री १० वाजेपर्यंत कर्फ्यू लागू केला आहे. काठमांडूमध्ये झालेल्या हिंसक निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर सैन्य तैनात करण्यात आले आहे. नेपाळ पोलिसांच्या मते, १२ हजारांहून अधिक निदर्शक रस्त्यावर उतरले आहेत. त्यांनी संसदेच्या गेट क्रमांक १ आणि २ वर कब्जा केला.

संसद भवनासोबतच, राष्ट्रपती भवन, उपराष्ट्रपती भवन आणि पंतप्रधान निवासस्थानाजवळ सैन्य तैनात करण्यात आले आहे. ३ सप्टेंबर रोजी नेपाळ सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम आणि यूट्यूबसह २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. हे प्लॅटफॉर्म नेपाळच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणीकृत नव्हते. मंत्रालयाने त्यांना २८ ऑगस्टपासून ७ दिवसांची मुदत दिली होती. त्याची अंतिम मुदत २ सप्टेंबर रोजी संपली. त्यानंतर नेपाळ सरकारने २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घातली.



**नेपाळमध्ये फेसबुक, ट्विटरसह २६ सोशल मीडियावर बंदी, संपूर्ण यादी**

मेटा प्लॅटफॉर्म: फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप.

व्हिडिओ आणि इमेज शेअरिंग: यूट्यूब, स्नॅपचॅट आणि पिंटरेस्ट. व्यावसायिक नेटवर्किंग: लिंक्डइन. बातम्या आणि सोशल नेटवर्किंग: एक्स (पूर्वी ट्विटर) आणि रेडिट. इतर प्लॅटफॉर्म: डिस्कॉर्ड, सिग्नल, थ्रेड्स, वीचॅट, क्वोरा, टम्बलर, क्लबहाऊस, मास्टोडॉन, रंबल, मीवी, व्हीके, लाइन, इमो, झालो, सोल, बोटिम आणि हॅम्रो पॅट्रो. मेसेजिंग ॲप्स: ऑनलाइन फसवणूक आणि मनी लॉंड्रिंगच्या चिंतेमुळे जुलै २०२५ मध्ये टेलिग्रामवर देखील बंदी घालण्यात आली होती.

## अंतरवाली सराटीत जरांगे पाटलांचे जल्लोषात स्वागत

अंतरवाली सराटी/प्रतिनिधी : मनोज जरांगे पाटील यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला असून आता ते अंतरवाली सराटी या त्यांच्या गावी गेले आहेत. यावेळी त्यांचे गुलाल उधळत जल्लोषात स्वागत केले. यावेळी त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. आज काय बोलावे कळत नाही. आपले गाव लढले आणि शेवटी मराठ्यांनी विजय मिळवला, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

मनोज जरांगे म्हणाले, मला आज काहीच सुचत नाही बोलायला. एक स्वप्न पाहिल्यासारखे वाटत आहे. आपला समाज लढून लढून दमला होता. पण आपण २ वर्षात हा लढा जिंकला. मराठवाडा खूप मोठा प्रदेश आहे. सातारा गॅझेटमध्ये त्या काळात २५ लाख कुणबी होते, आता किती झाले असतील. आमची जात गरीब असली तरी आम्ही समाधानी आहोत. कोणी काही बोलले की दुर्लक्ष करायचे. आपल्यात मतभेद झाले असतील, पण आता मागचे सगळे विसरून जायचे, एवढी मागणी माझ्या गावकऱ्यांना मागतो.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, लोक म्हणायचे मराठे एक येऊ शकत नाही. आपण एकजुटीने लढलो आणि त्यांना दाखवून दिले. आपल्या गावाने करून दाखवले. आपल्या गावातल्या महिलांनी सुद्धा साथ सोडली नाही. त्यांच्या सारख्या कट्टर महिला पूर्ण महाराष्ट्राने आदर्श घेण्यासारख्या आहेत. आपण सगळेच लढलो, हे सगळे श्रेय गरीब मराठ्यांचे आहे. अंतरवालीने विजयाचे गुलाल उधळलाच. मराठ्यांनी जवळपास ९६ टक्के लढाई जिंकली, उरलेले ४ टक्के काहीच नाही, असे जरांगे म्हणाले.

अंतरवालीने मोठा आदर्श दिला आहे महाराष्ट्राला. विजय मेळाव्याला संपूर्ण महाराष्ट्र अंतरवालीत येणार आहे. इथल्या गल्ल्या-गल्ल्यात गुलाल दिसून येईल. जेसीबीनेच काढावा लागेल गुलाल. गावकऱ्यांचे आभार मानतो, खूप लढू लागलात. पहिल्यांदा या व्यासपीठावर गुलाल पडला. जीआर निघाला म्हणजे मराठे अरक्षणात गेले, थोडा वेळ लागेल, असेही मनोज जरांगे म्हणाले.

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील हे सध्या रुग्णालयात दाखल असून त्यांना आज डिस्चार्ज देण्यापूर्वी पत्रकारांशी संवाद साधला. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी, अन्यथा दसरा मेळाव्यात मोठा निर्णय घेऊ, असे म्हणत जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे.

मनोज जरांगे म्हणाले, सरकारला एक विनंती आहे तुम्ही व्यासपीठावर सांगितले होते की हैदराबाद गॅझेट आपण लागू केले आहे. मला तुम्हाला स्पष्ट सांगणे आहे तुम्हाला काय करायचे काय नाही ते तुम्ही बघा, १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आहे, त्याआधी हैदराबादच्या गॅझेटच्या नुसार मराठवाड्यातल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची कारवाई सुरू केली पाहिजे. येत्या कॅबिनेटमध्ये आपण ही प्रक्रिया सुरू करावी आणि अंमलबजावणी करण्यात यावी. १७ सप्टेंबरच्या आधी ही प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी आहे.

## विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांची पत्रकार कुलकर्णी यांच्या निवासस्थानी भेट



लातूर- नांदेड पोलीस परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर येथील पत्रकार हरीराम कुलकर्णी यांच्या निवासस्थानी शुक्रवारी सायंकाळी सदिच्छा भेट दिली यावेळी शहाजी उमाप यांचा हरिराम कुलकर्णी कुटुंबातर्फे शाल श्रीफळ विठ्ठलाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला यावेळी ज्येष्ठ पत्रकार हरिराम कुलकर्णी जेष्ठ अरुण समुद्रे ज्येष्ठ पत्रकार अभय मिरजकर जेष्ठ पत्रकार हरिभाऊ तूगावकर,जेष्ठ पत्रकार श्रीधर स्वामी, मांजरा साखर कारखान्याचे संचालक आनंद बिडवे, नितीन जहीराबादकर उपस्थित होते. यावेळी शहाजी उमाप यांनी पत्रकार बांधव यांच्याशी संवाद साधला जुन्या आठवणींना उजाळा दिला

याप्रसंगी सुरेशराव कुलकर्णी, सौ. सुलभा कुलकर्णी, दिशा कुलकर्णी, इंजिनियर कृष्णा कुलकर्णी, राजाभाऊ उपस्थित होते

## जाधव (देशमुख) कुटुंबांचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचेकडून सांत्वन



लातूर- मांजरा साखर कारखान्याचे माजी शेतकी अधिकारी राजेंद्र (देशमुख) जाधव यांचे वडील अंबादास पंढरीनाथ देशमुख यांचे काही दिवसापूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले त्याबद्दल राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी रविवारी लातूर तालुक्यातील सिकंदरपुर येथील देशमुख यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले यावेळी जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोकराव काळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले , सचिन दाताळ,बाजार समितीचे संचालक शिवाजी देशमुख, राजेन्द्र देशमुख, बंकटराव देशमुख गोविंदराव देशमुख, अमीत देशमुख, त्रिवेणी देशमुख, ऐश्वर्या देशमुख पुष्पराज पाटील, ग्रामपंचायत सदस्य गोपाळ पाटील, गजानन बोयने, पृथ्वीराज ताटे श्रीपती सुरवसे काकासाहेब देशमुख भास्कर देशमुख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**हैदराबाद गॅझेटच्या आदेशाबाबत कॅव्हेट दाखल...**

### चिमटा दयाचा



**डीजेमुक्त गणेश विसर्जनामुळे नवा पायंडा पडला आहे ! चांगल्या बाबीचे अनुकरण युवकात केले जात आहे !!**

## मनपाच्या कलशात साडे चार टन निर्माल्याचे दान !

### – १७ हजार गणेश मूर्तींचेही संकलन – १३२ सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन








लातूर/प्रतिनिधी:जल प्रदूषण टाळण्यासाठी मनपाच्या वतीने राबविण्यात आलेल्या गणेश मूर्ती संकलन उपक्रमा अंतर्गत शहरातून जवळपास १७६६३ गणेश मूर्ती संकलित करण्यात आल्या.या सोबतच यंदा निर्माल्य संकलनासाठी पालिकेने ठेवलेल्या कलशामध्ये गणेशभक्तांनी ४३२० किलो निर्माल्याचे दान केले.या निर्माल्यापासून खत निर्मिती केली जाणार आहे.

परंपरेप्रमाणे गणेश मूर्तींचे जलाशयात विसर्जन केले जाते. मूर्तीसोबत निर्माल्यही पाण्यात टाकले जाते. यामुळे जलस्त्रोत प्रदूषित होतात. ते टाळण्यासाठी मनपा घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळाकडूनही मूर्ती संकलित करते.या सर्व मूर्तींचे नंतर बारा नंबर पाटी परिसरातील खाणी मध्ये विधिवत विसर्जन केले जाते.

या उपक्रमा अंतर्गत पालिकेने यावर्षी शहरात १५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे उभारली होती.त्यासाठी जवळपास ४३० अधिकारी व कर्मचारी नियुक्त केले होते.या केंद्रावर गणेश मूर्तींचे संकलन करण्यात आले. मूर्ती सोबतच भक्तांना निर्माल्य टाकता यावे यासाठी कलशही ठेवण्यात आले होते.या कलशांमध्ये ४३२० किलो निर्माल्य संकलित झाले. तसेच १२ नंबर येथील खदाणी मध्ये १३२ सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले.

निर्माल्य संकलनासाठी ठेवलेल्या कलशात जमा झालेल्या निर्माल्यापासून मनपा खत तयार करणार आहे. शहरातील गणेश भक्तांनी मनपाच्या आवाहनाला प्रतिसाद देत

आपल्या घरातील गणेश मूर्ती संकलन केंद्रात जमा केल्या.याबद्दल मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील नागरिक व सार्वजनिक गणेश मंडळाचे आभार मानले आहेत.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## सणातून चांगले उपक्रम राबवु शकतोत

सण असो की उत्सव हा देशातील नागरिकांना पारंपारिक संस्कृतीचा मेळा आहे असे म्हटले तरी चुकीचे नाही. भारतातील विविध प्रांतात विविध सण, उत्स्व व पारंपारिक सण साजरे करतात. महाराष्ट्रात नुकताच गणेश उत्सव साजरा झाला. कोठेही गालबोट न लागता सर्व जाती-धर्माच्या मंडळींनी साथ दिली. सहभागी झाले व आनंदाने उत्सव पार पडला. नंतर जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी प्रेषित मुहम्मद पैगंबरांचे विचाराने प्रेरीत होवून मिरवुणुक काढली. काही ठिकाणी चांगले उपक्रम राबविले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले तर काही ठिकाणी रक्तदान शिबीर घेतले. एकोपा दिसून आला. हा सण गणेश उत्सवानंतर साजरा करण्याचे ठरविल्याने रविवारी हा सण साजरा करण्यात आल्या. सर्वांनी आता एक चांगला उपक्रम राबविला. केवळ राबविलाच नाही तर अंमलात सुद्धा आणला. डीजेचा आवाज बंद केला. गणपती उत्सव किंवा अन्य उत्सव म्हटले की, डीजे आलाच. लेजर लाईटींग आली. वास्तविक सरकारने कितीही निर्बंध आणले तरी जनतेतून या विरोध असला पाहिजे. तो विरोध यावेळी दिसून आला. कोणीही डीजे लावले नाही. त्यामुळे सर्व गणेश भक्त व इतर धार्मिक उत्सवातील कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. चांगली बाब अनुकरण केले पाहिजे. या बाबत सर्वांनी पाठींबा दिला पाहिजे तो दिसून आला. वास्तविक विचार केला तर एक बाब लक्षात येते आपल्यापुर्वजांनी सण, उत्सव, मेळावे किंवा अन्य धार्मिक बाबीमध्ये काही तरी मर्म लपलेले आहे ते शोधणे काळाची गरज आहे. पुर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात सुद्धा उत्सवातून समाजनिर्मिती होत असत. एकदा देवाची मुर्ती बनविली, त्याची भव्य मिरवणुक काढली. ज्या समाजाने मुर्ती घडविली त्या समाजाला उच्चवर्णीयांनी उत्सवाच्या आनंदात सामिल होवू देत नव्हते. तो समाज दुर होता, त्याबाबत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी विनंती केली की, आपणही उत्सवात सामिल व्हावे. पालकीस हात लावावा. त्यावेळी इतर समाजाचे लोक कावरे-बावरे झाले. विरोध करण्याची हिंमत कोणात नव्हती तरी जी हालचाल पाहुन छत्रपती शिवाजी महाराज म्हणाले. तेही माणसे आहेत. त्यांच्याहातून मुर्ती घडली आहे. अनेकदा त्यांचे हात लागले आहेत. अशांना उत्सवात दूर करणे योग्य नाही. तेही आपल्यासारखे आहेत. त्यावेळी उच्चवर्णीय समाजाने त्यांनाही सोबत मिरवणुकीत घेतले व आनंदाने देवाच्यामुर्तीची स्थापना केली. याचा अर्थ उत्सव हे परिवर्तन घडवितात हे लक्षात घेतले पाहिजे. कोणी काही म्हणा भारतीय सण, उत्सव व परंपरा ही चांगले दर्शन घडवितात. चांगला मार्ग दाखवितात मात्र आपल्यात ते जाणून घेण्याची तयारी असावी लागते. मिरवणुक काढली तर त्याला संरक्षण द्यावे लागते. मुळात एका गावात पुतळ्याच्या चबुतऱ्यास पडला. कोणी पाडला याची माहिती न घेता गावात दंगल उसळली, मात्र कोणताही समाज समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही. यामुळे दंगळ उसळली. जाळपोळ सुरू झाली. त्यावेळी ही घटना एका बैलाने केली. पहाटेच्यावेळी बैल उधळला. त्याने चबुतऱ्यास धडक दिली. त्यामुळे तो आडवा झाला. साधी बाबी मात्र समाजाने वेळीच समजुन घेतली असती तर दंगल, हाणामारी झाली नसती. मुळात धार्मिकपनामुळे एकत्र येता येते तसे विध्वसंक बाबी घडू शकतात. त्यामुळे समाज हा जागृत असला पाहिजे. पहिल्यांदा एक बाब लक्षात घेतली पाहीजे की, अफवावर कोणत्याही परिस्थिती विश्वास ठेवू नये. जो पर्यंत प्रशासनाकडून खुलासा होणार नाही तो पर्यंत संयम राखला पाहिजे. तो राखणे हे मानवतेचे लक्षण आहे. मुळात आपल्या देशात अनेक सण आहेत ते सर्वांनी मिळून मिसळून साजरा करावेत. इतरांना कोणताही त्रास होणार नाही. याची दक्षता घेतली पाहिजे. ज्यावेळी मिरवणुका निघातात. त्यावेळी गाड्यांचा कर्कश आवाज निघतो. निघणारा धुर हा हानीकारक असतो. लहान लकरे व वृद्धांना यापासून त्रास होतो. याची आठवण सतत असली पाहिजे. बऱ्याचवेळा आपण इतरांची काळजी, आनंदाच्यावेळी घेत नाहीत. याबाबत विचार झाला पाहिजे. देशात अनेक राज्य आहेत. अशा विविध राज्यात विविध सण, उत्सव व परंपरा साजरे केले जातात. यावेळी कोणतीही अप्रिय घटना होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. बऱ्याचवेळा अफाट गर्दी होते. यामुळे चेंगराचेंगरीच्या घटना घडतात. त्या रोखू शकतो. कारण बऱ्याच वेळा गर्दीच्या ठिकाणी कोणीतरी माथेफिरू अफवा पसरवितो. त्यामुळे एकदम गर्दीच्या ठिकाणी सैरावैरा पळणारी मंडळी चेंगराचेंगरीत जीव गमवितात. ईश्वर सर्वत्र आहे. हे माहिती असून भावनिकपोटी गर्दी होत असेल तर त्यावेळी समजावून घेण्याची तयारी असली पाहिजे. उत्सवाच्यावेळी हौसे, गवसे व नवसे असतात. ही बाब आपल्यापुर्वजांनी सांगितली आहे. उत्साच्यावेळी कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे. प्रत्येकांनी स्वकाळजी घेतली पाहिजे. देव काही पळून जाणार नाही. गर्दी ओसरल्यानंतर दर्शन घेता येते. काही उत्सवात किंवा गर्दीच्या ठिकाणी सापडते का? किंवा फसवणुक करण्यासाठी काहीजन येतात. हौसे साठी, नवस फेडण्यासाठी किंवा काही सापडते का यासाठी मंडळी येत असते. त्यामुळे या बाबत सतर्कत सर्वांनी बाळगली पाहिजे. सणाची, उत्सवाची परंपरा ही खंडीत होता कामा नये. ती अखंड चालली पाहिजे. त्यासाठी सर्वात मोठा काय आहे तर संयम! तो राखला तर कोणतीही अनुचित प्रकार होणार नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. सण, उत्सव किंवा मिरवणुकीने अनेकांचा व्यवसाय चांगला चालतो. विक्री दुप्पट होते. अनेकांना रोजगार मिळतो. ही बाब नजरेआड करून चालणार नाही. त्यामुळे सर्वांनी विचार केला पाहिजे. संयम बाळगला पाहिजे. असा जर सर्वांनी विचार केला तर आनंदाने सर्व बाबी होवू शकतात. जे अविचारी आहेत. विध्वंसक विचाराचे आहेत त्यांची डाळ शिजणार नाही. आता डिजे वापरणार नाही, तो वापरलाही नाही किती तरी मोठा बदलाव दिसून आला. प्रत्येकांनी विचारपुर्वक वागले तर अप्रिय घटना घडणार नाहीत. चांगलेच घडणार आहे. यातून चांगले घडते ते घडविले पाहिजे.

# असे बांधा सिमेंट साखळीबंधारे

२०१२-१३ च्या दुष्काळाने काँक्रीटच्या साखळीबंधाऱ्याला जन्म दिला आहे. नाल्यामध्ये काँक्रीटचे बंधारे ओळीने ठराविक अंतरावर बांधून नाल्याच्या पात्रातच पाणीसाठा करून भूगर्भात जिरवण्याचा हा उपक्रम आहे. नाल्याचा उतार दोन बंधाऱ्यांमधील अंतर ठरवितो. खालच्या बंधाऱ्याचे साठलेले पाणी वरच्या बंधाऱ्याच्या पायथ्याला लागेल अशा पद्धतीने नियोजन केले जाते. या बंधाऱ्याची उंची साधारणत: २.५ ते ३ मी. असावी. माथारुंदी एक ते सव्वा मीटर व खालचा उतार ०.५ : १ व त्यापेक्षा कमी पण ठेवला तरी चालतो.

वास्तविक हे एक लहानसे दगडी धरण आहे. पाया खडकावर वा कठीण भूस्तरात घेतला जायला हवा. तीरावरची माती कोरून तीर वाहून जाऊ नये म्हणून दोन्ही तीरांवर बाजूभिंती बांधल्या जातात. बंधारा माथ्यापर्यंत पाण्याने भरल्यानंतर जास्तीचा पूर बंधाऱ्याच्या डोक्यावरूनच वाहतो आणि पूर्ण बंधारा सांडवा म्हणून काम करतो.

तळाशी उंचीवरून पडणाऱ्या पाण्याची ताकद कमी करण्यासाठी थोडे दगड रचावेत व गरज पडल्यास बंधाऱ्यालगत ३ मी. रुंदीचा हौद तयार करावा. यामुळे पाया उखडणार नाही. बंधाऱ्याची साठवणक्षमता वाढविण्यासाठी नालापात्राचे रुंदीकरण व खोलीकरण करावे. आजूबाजूची खासगी जमीन संपादित करावी लागणार नाही, इतकी रुंदी ठेवावी. खोली मऊ खडकापर्यंत करणे चांगले. पाणीसाठा वाढेल व पाणी जलदपणे मुरेल. त्या ठिकाणचा भूस्तर खोली किती करावी याचा अंदाज देतो. शक्यतो काळा खडक फोडण्याच्या फंदात पडू नये.

या बंधाऱ्याचे बांधकाम वेगळ्या पद्धतीने करावे लागते. जागेवरच काँक्रीट मिक्सर आणून वाळू, खडी, सिमेंट व पाणी यांच्या साह्याने काँक्रीट तयार करून ते मनुष्यशक्तीद्वारा जागेवर बसविलेल्या लोखंडी वा लाकडी फार्मवर्कमध्ये २० ते ३० सेंमी. उंचीच्या थरामध्ये एका बाजूने सुरवात करून भरावयाचे असते.

जसजसे काँक्रीट भरू, तसे ७५ मिमी. (३ इंच) व्यासाच्या व्हायब्रेटर निडलने काँक्रीट व्हायब्रेट करून गच्च करावयाचे असते. काँक्रीटमध्ये पाणी मोजकेच घालावयास पाहिजे. प्रमाणापेक्षा पाणी जास्त घातल्यास काँक्रीट पातळ होते व काँक्रीटला चिरा पडतात.

सिमेंट स्लरी फॉर्मवर्कच्या जोडीतून बाहेर जाते व बंधाऱ्याची ताकद व पर्यायाने आयुष्य कमी होते. पाणी कमी घातले तर काँक्रीट काम्पॅक्ट(घट्ट) होत नाही व ते भुंगीर (हनीकोंब) होते. त्याची ताकद पण कमी होते व आयुष्य कमी होते. चांगल्या काँक्रीटमध्ये पाणी व सिमेंटचे प्रमाण ०.४ ते ०.५ असते. हे प्रमाण तापमान जास्त असेल तर जास्त ठेवावे लागते. काँक्रीट लीन (एम १० व कमी) असेल तर प्रमाण जास्त ठेवावे लागते.

स्लंप कोनच्या मदतीने स्लंप मोजून पण काँक्रीटची वर्केबिलिटी ठरवता येते. साधारणत: एका दमात तीन ते चार थरांमध्ये एक मीटर उंचीचे काम करून दोन-तीन दिवसांत बंधाऱ्याचे काम पूर्ण करता येते. चोवीस तासांमध्ये फॉर्मवर्क काढून घेऊन तत्काळ क्यूरिंग (पाणी टाकणे) सुरू करणे आवश्यक आहे. उघडा सरफेस सतत २१ दिवस ओला ठेवणे जरुरीचे आहे. क्यूरिंग पुरेसे न केल्यास पाणी व सिमेंटच्या रासायनिक क्रियेस पाणी कमी पडते व काँक्रीटची ताकद कमी होते.

शासनातर्फे बांधले जाणारे साखळी बंधारे एम-१० काँक्रीटमध्ये बांधले जात असावेत. यामध्ये काही गोष्टींची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. काँक्रीटसाठी लागणारी खडी क्रशरमध्ये तयार केलेली तीन आकाराची असावी. ४० मिमी, २० मिमी. व १० मिमी. वाळू नदीतील वा क्रश सँड एफएम ३ पर्यतची असावी. वाळूमध्ये माती, सिल्ट असू नये. अन्यथा धूवून घ्यावे. वाळूत माती असल्यास काँक्रीटला चीरा पडतात व ताकद कमी होते.

खडी स्वच्छ व ग्रेडेड असावी. चांगली ग्रेडेड नसेल तर काँक्रीटमध्ये पोकळ्या राहातात व बंधाऱ्याला कमकुवत करतात. आपल्याला जमत नसेल तर जाणकाराकडून मिक्स डिझाईन करून घ्यावे व तीन प्रकारच्या खडीचे प्रमाण ठरवावे. साधारणत: एम-१० काँक्रीटसाठी, ३ भाग ४० मिमी., २ भाग २० मिमी. व १ भाग १० मिमी. ३ भाग वाळू व १ भाग सिमेंट (पोते ५० कि.) हे प्रमाण ठीक राहील.

कोर्सर एॅग्रीगेटच्या प्रतवारीनुसार हे प्रमाण बदलावे. सिमेंट चांगले असावे. सहा महिन्यापेक्षा जास्त जुने नसावे. सिमेंट चाचणी करूनच वापरावे. काँक्रीटींग केल्यानंतर सिमेंट चांगले नाही असे आढळल्यास फार अडचण निर्माण होते. काँक्रीटला दुरुस्त करणे जवळजवळ अशक्यच असते. दर ४० ते ५० घ.मी. वा दररोजच्या कामातून सहा क्यूब कॉस्ट करावेत. पहिले तीन सात दिवसानंतर व दुसरे तीन अठ्ठावीस दिवसानंतर अधिकृत प्रयोगशाळेतून चाचणी करून घ्यावे. स्लंप व काँक्रीटचे निष्कर्ष एका रजिस्टरमध्ये नोंद करून ठेवावेत. काँक्रीटसाठी वापरले जाणारे पाणी खारे नसावे व ते चांगले असावे.

आजकाल चांगले फॉर्मवर्क मिळतात वा तयार पण करून घेता येतात. लोखंडाचे नट-बोल्टचे फॉर्मवर्क चांगले असतात. प्लाय शीटचे लाकडी पण चालतात. फॉर्मवर्कच्या मजबुतीवर काँक्रीटची गुणवत्ता व आकार अवलंबून असतो. व्हायब्रेटरशिवाय काँक्रीटिंग करू नये. अनेक लोक काँक्रीटमध्ये जास्त पाणी टाकून रॉडिंग करून काम करतात, ते चुकीचे आहे. अलीकडे आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) प्लँटमधून आपल्याला पाहिजे त्या ग्रेडचे काँक्रीट मिळते. प्लँटमधील खडी, वाळू, सिमेंटही तपासून घ्यावे. यामुळे काम सोपे होते. पाया कठीण खडकापर्यंत घेऊन जावा.

एखाद्या फुटात खडकात गुंतविल्यास चांगलेच असते. तीन आठवड्यांपर्यंत चांगले क्यूरिंग केले जात नाही. जागेवर पाणी पुरेसे उपलब्ध नसते. सतत ओले ठेवले जात नाही; दुर्लक्ष होते, असे अनेक ठिकाणी आढळते. सध्या बाजारात क्यूरिंग कंपाऊंड मिळत आहे. फॉर्मवर्क काढल्यानंतर तत्काळ क्यूरिंग कंपाऊंडने सरफेस पेंट करावा. यामुळे बाष्पीभवन कमी होते आणि याच्या जोडीला सतत पाणी शिंपडून ओले पण ठेवावे. या दोन्हीमुळे क्यूरिंग चांगले होईल व अपेक्षित गुणवत्ता मिळवता येईल.

# पाणलोट विकास आवश्यक

कश्यप ऋषींनी तलावाच्या बांधकामाचे अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने विवेचन केले आहे. तलाव बांधत असताना शिल्पशास्त्रात पारंगत असलेल्या तज्ज्ञ व्यक्तीकडून राजाने आराखडा करावा.

कश्यपांनी खेड्यांच्या साखळीची कल्पना मांडली असून, ती अत्यंत महत्त्वाची आहे. राजाने आपल्या देशातील जंगलांमध्ये नद्यांच्या काठावर किंवा पठारावर गुराख्यांसाठी घरे व गुरांसाठी गोठे बांधून त्यांच्या निवासाची सोय करावी. लहान खेड्यांची साखळी तयार करावी. राजाने खेड्यातील लोकांसाठी विहीर व तलाव बांधून बागा तयार कराव्यात. भूमीचे विभाजन खेडी आणि नगरे जोडणारे रस्ते व देशातील महामार्गाने करावे.

कश्यपाने भूमीच्या परिस्थितीचा विचार करून तलाव तयार करण्यास सांगितले आहे. खेड्यांच्या किंवा नगरांच्या पश्चिम, उत्तर, पूर्व किंवा दक्षिण दिशेला जलाशय किंवा तलाव तयार करावा.

पाण्याच्या मडक्याप्रमाणे हा तलाव खोल असावा आणि त्याचा आकार बाणाप्रमाणे लांबोळा, तर काही ठिकाणी गोलाकार असावा; पण उथळ नसावा. त्याच्या संरक्षणासाठी मजबूत पाळ बांधावी. या पाळीच्या एका बाजूला मजबूत बांधलेला सांडवा असावा. त्यावर रस्ता असावा. तलावातील जास्त पाण्याला त्यातून मार्ग काढून द्यावा. म्हणून राजाने एक तर टेकडीच्या पायथ्याशी तलाव बांधावा किंवा सपाट भूमीवर मोठ्या तलावाला जोडलेला जलाशय (बोडी) तयार करावा किंवा मैदानी प्रदेशात घट्ट जमिनीवर बारमाही वाहणाऱ्या झऱ्याजवळ भरपूर पाणी साठवता येईल असा तलाव बांधावा. त्या जागी वाळू किंवा लहान दगड इत्यादी नसावेत.

अशा प्रकारे बांधलेल्या धरणाला पुराची दारे अशा प्रकारे बसवावीत, की जलाशय पाण्याने तुडुंब भरल्यानंतर पाळीवरून वाहणाऱ्या पाण्याने किंवा पाळी फोडून भरधाव वाहणाऱ्या पाण्याने खेडी, नगरे, किल्ल्याची भिंत, तटबंदी, बागबगीचे, खळ्याची जागा यांना धोका पोचू नये.

तलाव बांधल्यावर राजाने दर वर्षी अनेकदा त्याची पाहणी करावी. तलावाच्या पाळीवर पहारेकरी नेमले पाहिजेत. तलावातून काढलेले कालवे आणि लांबोळ्या आकाराचे तलाव यांची राखण करणे पावसाळ्यात आवश्यक असते.

पाण्याने पूर्ण भरलेल्या तलावामुळे धान्याचे उत्पादन होते. लोक सुखी होतात. रोगराई होत नाही व आगीची भीती राहत नाही.

जलाशयाच्या परिसरात सर्व द्विपाद, चतुष्पाद, पक्षी व सरपटणारे प्राणी यांना अवश्य वावर करू द्यावा. त्यामुळे त्या परिसरात कोणत्याही साथीच्या रोगाची भीती राहत नाही आणि वातावरण आल्हाददायक राहते.

जलाशयाला पाणी पुरविणाऱ्या बारमाही झऱ्यांची व ओढ्यांची काळजी घ्यावी, तसेच पर्वतावरील लहान-मोठे झरे, ओढे, जंगलातील ओहोळ आणि नैसर्गिक तळ्यांचे संरक्षण करावे. त्यामुळे जलाशयाला कायमचा पाण्याचा पुरवठा होत राहतो.

जलाशयाच्या परिसरात व कडेने वड, वडवर्गीय जातीचे वृक्ष, बांबू, वेत, कडुनिंब व कदंब ही झाडे लावावीत. या झाडांची मृदा धरून ठेवण्याची व जंतुनाशक म्हणून कार्यक्षमता असते. या झाडांची रोपे योग्य वेळी तलावाच्या काठावर, पाळीच्या उतारावर व कालव्याच्या सांडव्याजवळ लावावीत. त्याच वेळी स्नानाच्या घाटाला अडथळा होऊ नये व पाण्याच्या कुंडावर सावली राहावी.

**पाणलोट विकास क्षेत्राचा विचार...**

थोडक्यात, सध्या आपण ज्याला पाणलोट विकास क्षेत्र म्हणतो तीच कल्पना त्या काळात कश्यप ऋषींनी मांडलेली आहे.

जंगलातील झरे, ओढे यांची काळजी घ्यावी. नदीच्या उगमस्थानाच्या परिसराची काळजी घेतल्यास नदीच्या खोऱ्याची समृद्धी वाढते. ज्या प्रदेशात जलाशय निर्माण करणे शक्य नसेल अशा ठिकाणी चार प्रकारचे कालवे खोदण्यास सुचवले आहे.

कालव्याची रुंदी चार ते दहा हस्त म्हणजेच सहा ते पंधरा फूट असावी व त्या कालव्याचा शेवट एखाद्या तलावात करावा, असेही नमूद केलेले आहे.

**विहीर अथवा तलाव खोदण्यासाठीची कश्यप ऋषींची संहिता**

राजाने जलदेवता, वरुण, पृथ्वी देवता व वनदेवता यांची प्रार्थना करून मगच विहीर अथवा तलाव खोदण्यास आज्ञा द्यावी.

मानवाने निसर्गचक्र व निसर्गातील मूलतत्त्वांकडे फार काळजीपूर्वक व नम्रतेने बघायला पाहिजे. कारण त्यामुळेच मानवाच्या हस्तक्षेपानंतरही निसर्गातील समतोल कायम राहू शकेल.

उपासना किंवा प्रार्थना करण्यामुळे मानवाचा लोभ किंवा हाव या वृत्तीवर नियंत्रण राहते. त्याचबरोबर मानवाला वन, जल यांचे जीवनातील महत्त्व समजते.

कश्यप ऋषींनी श्रीमुख, विजय, दुंदुभी, चुडामणी, भद्र, जय, नंद असे जलाशयाचे अनेक प्रकार त्यांच्या वैशिष्ट्यांसह सांगितले आहेत.

**कश्यपांनी सुचविलेले जलाशयाचे आकारमान**

एखाद्या जलाशयाचे जास्तीत जास्त आकारमान व सुयोग्य आकार किती असावा याबाबत कश्यपांचा विचार आजही अतिशय महत्त्वाचा वाटतो. त्यांनी सुचविलेली परिमाणे पुढीलप्रमाणे :

योग्य आकाराचा जलाशय चार हजार क्युबीटचा असावा. (१ क्युबीट - १८ इंच).

मध्यम जलाशय दोन हजार क्युबीट व लहान जलाशय एक हजार क्युबीट असावा.

हे आकार ठरविताना फक्त अभियंत्याच्या यांत्रिकी कर्तृत्वावर अवलंबून राहू नये, तर वसाहतीची पाण्याची गरज, तेथील लोकांमधील सहकार, जंगलाचे स्वरूप, पर्वतावर उगम पावून खाली येणारे झरे, ओढे यांचे स्वरूप, मानवी वस्तीची जागा असा सर्वंकष विचार करावा.

**विश्ववल्लभ ग्रंथातील डोंगराळ भागातील जलसंचय**

चक्रपाणी मिश्राच्या विश्ववल्लभ ग्रंथातील विहिरी व तलावाची वैशिष्ट्ये हा ग्रंथ बागायतीवर आधारित आहे. त्यानेही सुरपाल ऋषींप्रमाणेच जमिनीखालील पाण्याचा शोध घेण्यासाठी अनेक खुणांची सविस्तर माहिती दिली आहे; पण तो राजस्थानातील असल्याने या खुणा त्याने जमिनीच्या अनुषंगाने सांगितल्या आहेत. डोंगराळ भागातील पाण्याचे प्रवाह शोधण्यास सांगितलेल्या वेगळ्या खुणांची भर या विषयात टाकली आहे. डोंगराळ भागात विहिरी खोदकाम करताना कठीण खडक लागू शकतात. त्यामुळे कामगारांच्या हत्यारांचे नुकसान होऊ नये म्हणून विशेष दक्षता घेण्यासाठी वेगळी माहिती चक्रपाणीने दिली आहे. निरनिराळ्या प्रकारच्या विहिरी आणि तलावांची माहिती त्याने दिली आहे. दोन पर्वतांच्या घळीतून वाहणाऱ्या नदीवर धरण बांधायचे तंत्र त्याने वर्णिले आहे.कोरडवाहू शेती आणि बागायतीवरील या ग्रंथातून प्राचीन काळाच्या पाण्याच्या नियोजनासंबंधी विविध माहिती उपलब्ध होते. आजचे तंत्रज्ञान पाश्चात्त्यांकडून मिळवलेले आहे. या दोन्हींचा मेळ घालण्याचे काम मात्र झालेले नाही. देशाच्या आणि मानवजातीच्या कल्याणाकरिता अभ्यास होणे आवश्यक आहे, असे वाटते.

# आद्य क्रांतिवीर: राजे उमाजी नाईक

जन्म : ७ सप्टेंबर १७९१
भिवडी, पुरंदर, पुणे

फाशी : ३ फेब्रुवारी १८३२
(पुणे)

सासवडच्या सत्तू नाईकच्या नेतृत्वाखाली सर्वप्रथम रामोशी समाज एकत्रित आला. सत्तू नाईक, साता-याचा चित्तूरसिंग नाईक व पुरंदरचा उमाजी नाईक हे रामोशांचे प्रमुख नेते होते. पुण्याच्या आग्रेय भागात रामोशाची जास्त दहशत होती.

सत्तू नाईकच्या नेतृत्वाखाली उमाजी नाईक व त्याचा भाऊ अमृता नाईक यांनी पुण्याजवळ भांबुर्ड्याचा लष्करी खजिना १९२४ - २५ साली लुटला. पुण्यातून रामोशांच्या हकालपट्टीसाठी ब्रिटिशांनी जवाहरसिंग रामोशी यास सासवडचा अंमलदार बनविले. पण उमाजी व सत्तू नाईकाने जवाहरसिंग व त्याच्या मुलाच्या मुसक्या आवळल्याने त्याने इंग्रजांची नोकरी सोडून दिली .

सत्तू नाईक नंतर रामोशांचे नेतृत्व उमाजी नाईकवडे आले. भूजाजी, कृष्णाजी, येसाजी व अमृता हे उमाजीचे विश्वासू सरदार होते. उमाजी स्वत: ला राजे समजून घेत असे. पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी या गावी १७९१ साली उमाजीचा जन्म झाला होता.

ब्रिटिश काळात रामोशांची संख्या १८००० होती. दरम्यानच्या काळात उमाजीने एका यात्रेत तलवारीने कोतवालाचे तुकडे करून पोलिसात दहशत पसरवली. उमाजीला पकडण्यासाठी ब्रिटिशांनी १८२६ साली पहिला जाहीरनामा काढला. यानुसार उमाजी व त्याचा साथीदार पांडुजी यांना पकडून देणा-यास १०० रुपये ईनाम जाहीर केले. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

सरकारने पुन्हा जाहीरनामा काढून ईनामाची रक्कम १२०० रूपये कली आणि जाहीरनाम्यात असे म्हटले की, सरकारला मदत केली नाही तर बंडवाल्यात सामिल झालात, असे समजण्यात येईल. यावेळी उमाजीस पकडून देण्याचा विडा उचलणा-या शिवनाक यास रामोशांनी ठार केले.

त्यावेळी उमाजीचा धाक पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, जेजुरी, सासवड व मराठवाड्याच्या काही भागात होता. यावेळी पुण्याचा कलेक्टर एच. डी. रॉबर्टसन याने वेळोवेळी जाहीरनामा काढून उमाजीला पकडण्याचे ठरविले. कोणीच गददारी न केल्यामुळे त्याच्या हाती काहीच आले नाही.

रॉबर्टसनने दरम्यान कोकणावर वचक बसविण्याठी बंडखोरांची माहिती देणा-यासाठी खास बक्षिस जाहीर केले. या काळात उमाजीने ठाणे व रत्नागिरी जिल्हयातील लोकांनी ब्रिटिशांकडे महसूल न भरता उमाजीकडे दयावा असे जाहीर केले. याच्या परिणामस्वरूप भोर संस्थानातील १३ गावानी उमाजीकडे महसुल भरला.

शेवटी ब्रिटिशांनी उमाजीची बायको, दोन मुले व एक मुलगी यांना अटक केली. त्यामुळे कुटुंबाखातर उमाजी ब्रिटिशांना शरण आला. ब्रिटिशांनी त्याचे सर्व गुन्हे माफ करून त्याला सरकारी नोकरी दिली. पुणे व सातारा जिल्हयात शांतता व सुव्यवरथा राखण्याचे काम उमाजींकडे देण्यात आले. पण पुढे नंतर १३ गावांच्या महसुलावरुन उमाजी व ब्रिटिश यांच्यात वाद सुरू झाला.

१८३१ साली ब्रिटिशांनी जाहीरनामा प्रसिध्द करून उमाजीला पकडण्याची जबाबदारी कॅप्टन अलेक्झांडर व कॅप्टन मैकिन्तोश यांच्याकडे सोपविली. उमाजी, येसाजी, मुंजाजी व कृष्णाजी यांना पकडून देणा-यास ५००० रूपये व २ बिघा जमीन बक्षीस देण्याचे जाहीर केले. त्यापैकी एकटया उमाजीस पकडून देणा-यास २५०० रूपये व १ बिघा जमीन जाहीर करण्यात आली. बक्षीसाच्या आमिषाला बळी पडून एकेकाळचे त्याचे जवळचे साथीदार काळू रामोशी, नाना रामोशी यानी गददारी केली. उमाजीचा जुना शत्रु बापूसिंग यानेही त्यांना मदत केली. १५ डिसेंबर १८३१ रोजी कॅप्टन मैकिन्तोशने पुण्याच्या मुळशी तालुक्यातील अवळस येथे उमाजीला अटक केली. पुण्याच्या तहसिलदार कचेरीत ३ फेब्रुवारी १८३२ रोजी उमाजीला फाशी देण्यात आली. त्याठिकाणी आता पुतळा स्वातंत्र्याचा संदेश देत ठामपणे उभा आहे.

उमाजीचा पहिला चरित्रकार व उमाजीस पकडण्याच्या मोहीमेचा प्रमुख मैकिन्तोश म्हणतो, उमाजीच्या नजरेसमोर शिवाजी राजांचे उदाहरण होते. स्वराज्य संस्थापक शिवाजी हे त्याचे श्रध्देय व स्फूर्तीचे स्थान होते. शिवाजीच त्याचा आदर्श होता. मोठमोठया लोकांनी मला स्वत: सांगितले की, उमाजी हा काही असला तसला भटक्या दरोडेखोर नाही. त्याच्या नजरेसमोर नेहमी शिवाजीचे उदाहरण होते. शिवाजी महाराजांप्रमाणे आपण मोठे राज्य कमवावे, अशी त्याची इच्छा होती.

आम्हाला मात्र त्याने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी इंग्रज सरकारशी दिलेल्या दीर्घकालीन लढ्याची जाणीव नाही हे आपल्या देशाचे दुर्दे व होय.

# केस गळती रोखण्यासाठी तसेच घनदाट केसांसाठी ...



मुंबई: हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात आणि बदलत्या आहारामुळे केस गळण्याची समस्या खूप सामान्य झाली आहे. अनेकजण या समस्येमुळे त्रस्त आहेत. जर तुम्हालाही केस गळती थांबवायची असेल आणि केसांची वाढ वाढवायची असेल, तर तुमच्या आहारात काही विशिष्ट सुपरफूड्सचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. या लेखात अशा ७ पदार्थांबद्दल माहिती देण्यात आली आहे, जे केसांच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत.

१. आवळा: व्हिटॅमिन सीचा उत्तम स्रोत असलेला आवळा केसांच्या मुळांना मजबूत करतो. तसेच, तो टाळूमध्ये रक्तप्रवाह सुधारतो, ज्यामुळे केसांची वाढ होण्यास मदत होते.

२. काळे तीळ: काळ्या तिळामध्ये भरपूर प्रमाणात लोह (खीप) आणि कॅल्शियम असते. हे दोन्ही घटक केसांना पोषण देतात. त्यामुळे केस गळणे कमी होते आणि ते अधिक घनदाट होतात.

३. चिया सीड: ओमेगा-३ फॅटी ॲसिडने (जाशसर-३ ऋींूं -लळव) समृद्ध असलेले चिया सीड केसांची वाढ वाढवतात. त्यांच्या सेवनाने केस मऊ आणि चमकदार बनतात.

४. काळे हरभरे: केसांच्या मजबुतीसाठी काळे हरभरे खाणे खूप फायदेशीर आहे. यामध्ये असलेले प्रोटीन आणि झिंक (नळपल) केस गळती कमी करून नवीन केसांच्या वाढीला प्रोत्साहन देतात.

५. ताजे खोबरे: निरोगी चरबी (क्शरश्रींहू ऋीं) आणि मिनरल्सने (चळपशीरश्री) परिपूर्ण असलेले ताजे खोबरे केसांना आतून पोषण देते. तसेच, ते टाळूमधील कोरडेपणा दूर करण्यास मदत करते.

६. पालक: लोह (खीप) आणि व्हिटॅमिन ए (तळींराळप -) ने भरलेली पालक केसांच्या आरोग्यामध्ये सुधारणा करते. तिच्या नियमित सेवनाने केसांची नैसर्गिक वाढ वेगाने होते.

७. योगर्ट (दही): दह्यामध्ये प्रोटीन आणि प्रोबायोटिक्स (झीलळींळली) असतात, जे टाळूचे आरोग्य चांगले राखतात. दही खाण्याव्यतिरिक्त केसांना लावल्याने ते मऊ आणि रेशमी होतात.

या पदार्थांचा आहारात समावेश करून तुम्ही तुमच्या केसांचे आरोग्य सुधारू शकता आणि केस गळण्याच्या समस्येवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवू शकता.

# उपाशी पोटी खा फळे, मिळतील अनेक फायदे

मुंबई : सकाळी उपाशी पोटी फळे खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते, पचनक्रिया सुधारते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते. परंतु, काही फळे उपाशी पोटी खाणे जास्त उपयुक्त ठरते. पपई : पपई हे एक हलके आणि पचन होण्यास सोपे फळ आहे. यामध्ये 'पपाइन' नावाचे एन्झाइम असते, जे पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. सकाळी उपाशी पोटी पपई खाल्ल्याने पोट साफ राहते. केळी: केळी त्वरित ऊर्जा देणारे फळ आहे. यामध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबर मोठ्या प्रमाणात असतात. सकाळी एक किंवा दोन केळी खाल्ल्याने दिवसभर ऊर्जा टिकून राहते आणि पोटाचे आरोग्यही चांगले राहते.सफरचंद: सफरचंदामध्ये भरपूर फायबर, जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात.

# शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे शिक्षकांच्या प्रतिष्ठेला तडा

आज पाच सप्टेंबर...शिक्षक दिन नेहमीसारखा उत्सवाने साजरा होईल; मात्र शिक्षक दिनाचा आदराचा भाव किती प्रमाणात व्यक्त होईल? एक शिक्षक राष्ट्रपती होणे हे तमाम शिक्षणक्षेत्रात काम करणार्यांसाठी अभिमानास्पद आहे. यातून शिक्षक हे राष्ट्रपतीपदासाठी लागणार्या पात्रतेचे असू शकतात. माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यामुळे शिक्षकी पेशाची प्रतिष्ठा उंचावण्यास मदत झाली आहे. एक शिक्षक राष्ट्रपती पदासारख्या उच्च पदावर पोहचतात, तेही अभ्यास, चिंतनशीलता, सामाजिक व राष्ट्रीय दायित्वाच्या भूमिकेच्या जोरावरती. ज्ञानवंत माणूस सर्वोच्च पदावर पोहचतोच किंबहुना तीच त्या पदाची गरज असते. शिक्षण क्षेत्रात काम करणार्या प्रत्येकासाठीच हा रस्ता कोठे जाऊ शकतो हे त्याचे दिशादर्शन आहे. अनेक शिक्षकांनी भारतीय इतिहासाच्या पानावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्या शिक्षकांची इतिहासातील नावे घेऊन आजवर प्रवास सुरू राहिला आहे; मात्र वर्तमानात त्या पाऊलवाटा दिवसेंदिवस शिक्षकांसाठी कठीण बनत चालल्या आहेत. शिक्षणाच्या बाजारीकरणाने आणि शिक्षणातील वाढत्या अर्थपूर्णतेने शिक्षणाचे मोल हरवत चालले आहे. शिक्षकांपेक्षा संस्थाचालक आणि संस्था महत्त्वाच्या ठरू लागल्या. नीतिमूल्यांपेक्षा मार्क महत्त्वाचे ठरू लागले. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या नात्यातील ओलाव्याला विक्रेता ग्राहकाचे स्वरूप आले आहे. त्यामुळे सरस्वतीच्या दारातही लक्ष्मीची चमक दिसू लागली. आज सरस्वतीच्या उपासकांपेक्षा लक्ष्मीचे उपासक ज्ञानमंदिरात अधिक मान मिळवताना दिसत आहे. हा प्रवास आपल्याला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणार आहे, की अधोगतीच्या हे काळ ठरवेल. जागतिकीकरण झाले आणि त्याचा परिणाम सर्व क्षेत्रावर झाला आहे. त्याला शिक्षण क्षेत्रही अपवाद राहिले नाही. खासगीकरण, बाजारीकरण आणि उदारीकरणामुळे सर्व क्षेत्रातील विश्वासाचा धागा सैल होत गेला आहे. शिक्षण क्षेत्रातही नफा हाच व्यवहाराचा भाग उरला आहे. समाजात नैतिकतेचा धाक फारसा उरला नाही. माणसांच्या नात्यात प्रेमापेक्षा अर्थ अधिक महत्त्वाचा ठरू लागला. पैसा कमविण्याचा विचार प्रत्येक व्यवसायात असतोच; पण त्याला नैतिकतेच्या आणि प्रेमाच्या भिंतीतरी होत्या. नंतरच्या काळात हळूहळू त्या भिंती कोसळण्यास सुरुवात झाली. आता त्या कोसळण्याची खंतही वाटेनाशी झाली.




एकूणच जीवनाच्या वाटचालीत सर्व क्षेत्रे अधिक अर्थकेंद्रित होत गेली. शिक्षण देखील अधिक स्मार्ट करण्याच्या नादात अर्थ केंद्रित झाल्याने ते अर्थ प्रवाही झाले. शिक्षणातून शहाणपण पेरणे, समाज घडविणे, समाजजागृती करणे, व्यक्तीमध्ये असलेल्या गुणांचा परिपोष करणे, राष्ट्राची जडणघडण करणे, व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे यांसारख्या गोष्टी शिक्षणाच्या उद्दिष्टात नमूद केल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्यासाठीच्या पाऊलवाटा निर्माण करण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. शिक्षण हे राष्ट्र उद्धाराचे केंद्र आहे याचा हळूहळू विसर पडत चालला आहे. बाजारीकरणाच्या व्यवस्थेत शिक्षणातून पैसा कमविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. बाजारीकरणातून दर्शनीय असलेले शिक्षण प्रदर्शनीय बनले. माणूस घडविणारा शिक्षक हा समाजमनात नेहमी महत्त्वाचा वाटायचा, पण त्या ऐवजी आता इमारती उंच वाटू लागल्या. माणसांची उंची, ज्ञानाची खोली शिक्षणातून हरवत चालली आहे. ज्ञानाच्या व्यापक विस्तारापेक्षा मुक्या भिंतीचा विस्तार आकर्षित करू लागला. शिक्षण ज्ञानकेंद्रित, माणूस केंद्रित बनण्याऐवजी अर्थ केंद्रित बनले. त्यामुळे शिक्षण पवित्र मंदिराच्या ऐवजी बाजारीकरणाचे केंद्र बनले. खासगीकरणाने शिक्षणाची दारे खुली झाली, पण त्यातून समाजात विषमतेची बीजे अधिक भक्कम होत गेली. शाळांमधून चातुर्वर्ण्य व्यवस्था अधिक भक्कम होण्यास मदत झाली. कधी काळी समाजात जातिव्यवस्थेवर असणारी चातुर्वर्ण्य व्यवस्था शिक्षणात आर्थिक वर्गावर येऊन ठेपली आहे. त्यातून गरीब, अतिगरीब, मध्यमवर्ग आणि श्रीमंत व अतिश्रीमंत या वर्गाने आपापल्यासाठी शाळांची जणू निश्चित निर्मिती केली. त्यातून शिक्षण समाजातील विषमता नष्ट करण्याचे साधन बनण्याऐवजी वर्तमानात विषमतेचे साधन बनले आहे. ज्याने शिक्षणांचा आदर्शवादी, नैतिक परिणाम स्वतःच्या जीवनात अनुभवला नाही त्याने शिक्षणात आदर्शवादी काही पेरावे हे कसे घडेल. त्यामुळे पैसा पेरला तर पैसा उगवणार आणि नाही उगवला तर उगवण्यासाठी त्या दिशेने प्रवास घडणार हे निश्चित आहे. या अर्थपूर्णतेमुळे शिक्षक हा नोकर झाला आहे. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या नात्याला व्यवहाराचे स्वरूप आले आहे. त्यातून अधःपतनास सुरुवात झाली. त्यामुळे शिक्षणात काम करणार्या शिक्षकांचा परिचय हळूहळू बदलत चालला आहे. या देशाने अनेक गुरूजी अनुभवले. त्यांचा परिचय त्यांच्या विषयाच्या ज्ञानावरती होत होता. त्यांच्या सामाजिक योगदानाने ते ओळखले जात होते. आज असा परिचय हरवत चालला आहे. आज शिक्षकांचा परिचय त्यांनी विकसित केलेल्या व्यवसायाने होत चालला आहे. त्यामुळे शिक्षकीपेशा पेक्षा त्यांच्या व्यवसायाची छाप चेहर्यावरती अधिक दिसू लागली आहे.

या बाजारीकरणामुळे शिक्षकी पेशाच्या प्रतिष्ठेची अवनती होत आहे. शिक्षक हा शिक्षण संस्थारूपी दुकानात माल विकणारा विक्रेता बनला आहे. तो माल विकताना अधिक नफा मिळविण्याचे ध्येय आहे. त्यामुळे बाजारात नसलेल्या गुणांचा घोषा करून माल विकला जाणार आहे. तेथे फसव्या गुणवत्तेला मुलामा दिला जाऊन समाज व राष्ट्राची फसवणूक होणार असेल तर विचार करण्याची गरज आहे. विकणारा स्वतःचा विवेक गमावून बसला तर आपण ग्राहकाला फसवत आहोत हे लक्षात घेण्याची गरज उरत नाही. या देशाने गुरूला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. याच मातीने व्यासपोर्णिमा अनुभवली आहे. कोणत्याही वर्तुळात सर्वांत मोठा भाग म्हणजे त्याचा व्यास असतो. समाजाचा व्यास हा गुरुजीच असतो. गुरुजी ही संकल्पना अत्यंत पवित्र आहे.


यासाठी शिक्षणात कार्यरत असलेल्या सर्वांनीच पुन्हा भविष्यासाठी प्रकाशबेट निर्माण करायचे असेल तर इतिहासाचे पाठ गिरवावे लागतील. वर्तमानात आत्मपरीक्षणाचा पाठ गिरवावा लागेल. ज्ञानाची साधना करण्याबरोबर समर्पितवृत्ती जोपासावी लागेल. नव्या काळाची भाषा समजून घेण्याबरोबर नव्या युगाशी नाते जोपासावे लागेल. मूल्यांवरती विश्वास ठेवून त्या दिशेचा प्रवास सुरू ठेवावा लागेल. वर्तमानात प्रवाहपतित होण्यापासून स्वतःला वाचवावे लागेल. लांगुलचालनासाठी पाय चालण्याऐवजी समाजाने गुरुजींच्या पायावर नतमस्तक व्हावे याकरिता पायांचे पावित्र्य वाढविण्यासाठी सतत ध्यास घेऊन चालावे लागेल. तो प्रवास आदर्शवादाचा आहे. चालणे कठीण आहे. त्या दिशेचा प्रवासच या क्षेत्रातील आजच्या शिक्षकांना गुरूजीचे स्वरूप देईल. त्यामुळे फक्त गरज आहे शिक्षकांनी इतिहासाची पाने चाळत नव्याने कार्यरत राहाण्याची. त्या मार्गाने जाणे घडेल तर शिक्षक दीन न ठरता शिक्षक दिन ठरेल. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे जीवन हा आपल्या सर्वांसाठी वस्तुपाठ आहे. त्यांनी जीवनभर ज्ञानाची साधना केली. भारतीय तत्त्वज्ञानाचा केलेला सखोल अभ्यास आणि त्या दिशेने जीवनानुभवाची चाललेल्या पाऊलवाटेने जाताना त्यांनी या देशातील अनेकांना आपल्या मागे चालणे भाग पाडले. समाज उत्तमतेचे अनुकरण करतो. शिक्षकांनी समाज आपल्या मागे यायला हवा. शिक्षक हा समाजाचा दिशादर्शक असतो. त्याने तत्त्वाशी प्रतारणा न करता सतत तत्त्वाशी बांधिलकी स्वीकारून मार्गक्रमण केले तर शिक्षक समाजाचे व राष्ट्राचे निर्माते ठरतील. हा बदल समाजाचे आणि राष्ट्राचे उत्थान घडविणारा ठरणार आहे. शेवटी शिक्षकांची उंची हीच राष्ट्राची उंची असते. त्यामुळे आजच्या शिक्षकदिना अधिक गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे.

## डॉक्टर टीप्स

### नियमित झोप आणि व्यायामाने सुधारते वैवाहिक जीवन



गोल्डन रूल सिद्ध होऊ शकतो. कारण रात्री उशीरापर्यंत जागत राहण्याने नपुंसकत्वाचा धोका वाढतो, अलीकडेच झालेल्या एका शोधात स्पष्ट झाले आहे. या अध्ययनानुसार लवकर झोपणारे पुरुष म्हणजे सुमारे १०.३० वाजेपर्यंत झोपणार्या पुरुषांमध्ये उत्तम गुणवत्ता असलेले शुक्राणू होण्याची शक्यता अधिक असते. इतर पुरुषांच्या तुलनेत जे ११.३० वाजता झोपतात, त्यांच्या शुक्राणू म्हणजे स्पर्मची गुणवत्ता बिघडते. तसेच मागील अनेक शोध झाले आहेत ज्या झोप पुरुष आणि महिलांच्या प्रजनन क्षमतेवर प्रभाव टाकते हे स्पष्ट झालेले आहे. परंतू याचा पुरावा नाही. परंतू मेंदूचा काही भाग स्लीप हार्मोन आणि शुक्राणू प्रक्रियेचं उत्पादन दोन्हीला प्रभावित करतं.अध्ययनाप्रमाणे अनिद्रा शुक्राणू पतनाचे मूळ कारण आहे. या व्यतिरिक्त अनेक कारणं देखील सामील आहेत ज्यात मनोवैज्ञानिक कारणं देखील आहेत. झोप न झाल्यामुळे पुरुषांना अधिक ताण जाणवतो ज्यामुळे त्यांच्या पौरुष क्षमतेवर वाईट परिणाम पडतो.



## विनोद




निवडणुकीच्या काळात एका नेत्याने आपल्या पत्नीस विचारले, 'माझे सर्व हितचिंतक, मित्र माझ्यासाठी काहीतरी करणार आहेत. तू माझ्यासाठी काय करावयाचे ठरवले आहेस?' पत्नीने जवळचा एक मोठा रुमाल पतीच्या हातात दिला आणि म्हणाली, 'हा रुमाल जवळच ठेवा. निवडणुकीनंतर अश्रू पुसायला त्याची मदत खूप होईल.'

## संदेश

Ladka speedbraker ke upper se bike nikalega ya side se.... ye espe depend karta hai peeche Friend Betha Hai ya Girlfriend...

## सुविचार



कोणतेही कार्य ही ईश्वराची सगुण मूर्तीच आहे असे जाणून कामाला लागा.

**– बहिणाबाई चौधरी**


**संस्कृत सुभाषित**

**कुग्रामवासः कुलहीनसेवा, कुभोजनं, क्रोधमुखी च भार्या।**
**पुत्रश्च मुर्खो, विधवा च कन्या, विनाऽग्निना षट् प्रदहान्ति कायम्॥**

अर्थ – वाईट गावात राहणे, कुलशील नसलेल्यांची (चारित्र्यहीनाची) सेवा, वाईट भोजन, रागीट चेहऱ्याची पत्नी, मूर्ख पुत्र आणि विधवा कन्या या सहा गोष्टींमुळे माणूस आगीशिवाय जळतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. ९



## आडवे शब्द

१. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस
३. चामखीळ
४. पराजय
७. कौसल्यापुत्र
९. कर्ज देणारा
१०. नवरदेवाकडील मंडळी
१२. पंख
१३. कपडालत्ता
१६. तापविणारा सूर्य
१८. गुजराथी नृत्यप्रकार
१९. झोपडी
२०. भांडण
२१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा.क, का, की, कि, कु, कू, इत्यादी
२३. चप्पल
२४. लवकर, वेगाने
२६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु
२७. बारा वर्षांचा काळ
२९. कोर्टातील कथन
३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम
३२. नवरा (ग्रा.)
३५. रमणीय
३६. धुंदी
३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी
४०. श्रीमंत
४१. एक क्षार
४२. रस काढण्याचे यंत्र
४४. चिंतन
४५. अंत:करण
४६. तेज
४८. मध्यभागी
५०. प्रत्येक दिवशी
५२. वांग्याचा खमंग पदार्थ
५३. गुरांचा समुदाय
५४. मऊ
५६. कौरव पांडवांची कथा
५८. पुरुष, शूर पुरुष
५९. समीक्षा
६२. मदनपत्नी
६३. कपटी
६८. एक पालेभाजी
६९. परमेश्वर
७०. चिंता
७२. मिठी
७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा
७४. अजागळ
७६. आशीर्वाद
७९. एकत्रित रडणे
८०. सुगंध
८१. बारावी रास
८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

## उभे शब्द

१. व्यर्थ बडबड, चऱ्हाट
२. लग्नासाठी जमलेले गणगोत
३. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे)
३अ. फुरसत
४. पुन्हा पुन्हा
५. घर
६. आशीर्वाद
७. असुर
८. नामशेष
९. सर्प
११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात
१२. अनुमती
१४. वाढलेला व्याप
१५. वही
१७. सोंगट्यांचे वस्त्र
१९. झीज, नुकसान
२०. पोते
२१. दावा
२३. हेलपाटा
२५. पृथ्वी
२६. कुबड
२८. घागरा
३०. एकत्र गोळा करणे, जमविणे
३१. श्रीविष्णूचे नावडते फूल
३३. दशमुखी रावण
३४. चाक
३७. एक हिंस्र पक्षी
३८. झोंबणारे
३९. लिहिलेले वाचणारा
४०. सन्मानाची रक्कम
४३. पंकज
४४. माझे
४५. इच्छा
४७. अभिप्राय
४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील
५०. इटलीची राजधानी
५१. लोखंड (हिंदी)
५२. ओहोटीच्या विरुद्ध
५३. पाषाणहृदयी
५५. रसदार
५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
५७. हिंदुस्थान
५८. मौज
६०. फणसाचा एक प्रकार
६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ
६३. गाजावाजा
६४. तोटी
६६. खिडकीची काच
६७. यावर्षी
६८. नोकर
७१. आयुष्य
७५. पुरे!
७७. मादीच्या विरुद्ध
७८. धातूचा जाड-बारीक धागा

## आडवे उत्तर

१.वळीव ३.मस ४.पराभव ७.राम ९.सावकार १०.वरपक्ष १२.पर १३.कापडचोपड १६.तपन १८.रासगरबा १९.खोपट २०.वाद २१.बाराखडी २३.खेटर २४.भरभर २६.पोप २७.तप २९.साक्ष ३०.संगीत ३२.दादला ३५.रम्य ३६.नशा ३८.चक्रवाक ४०.मालदार ४१.नवसागर ४२.चरक ४४.मनन ४५.मन ४६.चमक ४८.मधोमध ५०.रोज ५२.भरीत ५३.कळप ५४.नरम ५६.महाभारत ५८.मर्द ५९.टीका ६२.रती ६३.गजानन ६५.पाताळयंत्री ६८.चाकवत ६९.देव ७०.काळजी ७२.कव ७३.पो ७४.गबाळ ७६.वरदान ७९.रडारड ८०.सुवास ८१.मीन ८२.नरवीर

## उभे उत्तर

१.वटका २.वऱ्हाड ३.मसाप ३अ.सवड ४.परतपरत ५.भवन ६.वर ७.राक्षस ८.बरबाद ९.साप ११.परान्नभक्षण १२.परवानगी १४.पसारा १५.चोपडी १७.पट १९.खोट २१.बारदान २२.खटला २३.खेप २५.रसा २६.पोक २८.परकर ३०.संकलन ३१.तगर ३३.दशानन ३४.चक्र ३७.ससाणा ३८.चरचरीत ३९.धोपटी ५०.रोम ५१.लोहा ५२.भरती ५३.कर्दनकाळ ५५.रसाळ ५६.मनकवडा ५७.भारत ५८.मजा ६०.कांपा ६१.संत्री ६३.गवगवा ६४.नळ ६६.तावदान ६७.यंदा ६८.चाकर ७१.जीवन ७५.बास ७७.नर ७८.तार



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकिस्तानात क्रिकेट सामन्यादरम्यान भीषण बॉम्बस्फोट; एकाचा मृत्यू, अनेक जण जखमी

इस्लामाबाद-पाकिस्तानमधील क्रिकेट सामन्यादरम्यान मोठी धक्कादायक दुर्घटना घडली आहे. क्रिकेट मैदानावर सामना सुरू असताना बॉम्बस्फोट झाल्याने एकच हाहाकार उडाला. या बॉम्बस्फोटात अनेक जण जखमी झाले असून एका व्यक्तीचा मृत्यू देखील झाला आहे. पण नेमके काय घडले,खैबर पख्तूनख्वा प्रांतातील एका क्रिकेट स्टेडियममध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाने खळबळ उडाली आहे. स्फोट झाला तेव्हा स्टेडियममध्ये सामना सुरू होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाजौर जिल्ह्यातील खार तहसीलमधील कौसर क्रिकेट मैदानावर आयईडी वापरून हा स्फोट करण्यात आला.
क्रिकेट मैदानावरील बॉम्बस्फोट हो कोणाला तरी लक्ष्य करून करण्यात आल्याची शक्यता वर्तवली जात आहे. आतापर्यंत कोणत्याही दहशतवादी गटाने या स्फोटाची जबाबदारी स्वीकारलेली नाही. गेल्या महिन्यात दहशतवाद्यांविरुद्ध सुरू झालेल्या ऑपरेशन सरबकाफला प्रत्युत्तर म्हणून हा स्फोट घडवून आणल्याचा पोलिसांचा आरोप आहे. या बॉम्बस्फोट झालेल्या घटनेचा व्हीडिओदेखील व्हायरल होत आहे.गेल्या शनिवारी, कोहट जिल्ह्यात पोलिसांशी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी मारले गेले.

***

### भारताने चौथ्यांदा हॉकी आशिया कप जिंकला:अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा ४-१ असा पराभव केला

मुंबई-भारताने पुरुष हॉकी आशिया कप २०२५ चे विजेतेपद जिंकले आहे. रविवारी बिहारमधील राजगीर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण कोरियाचा ४-१ असा पराभव केला. भारताने हे विजेतेपद चौथ्यांदा जिंकले. या विजयासह भारताने २०२६ च्या विश्वचषकातही स्थान मिळवले. अंतिम सामन्याच्या पहिल्याच मिनिटाला भारताकडून सुखजीत सिंगने गोल केला. दुसऱ्या क्वार्टरमध्ये दिलप्रीत सिंगने पुन्हा गोल केला आणि भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. तिसऱ्या क्वार्टरमध्ये दिलप्रीतने आणखी एक गोल केला. चौथ्या क्वार्टरमध्ये अमित रोहिदासने पेनल्टी कॉर्नरवर गोल करून भारताला ४-० अशी आघाडी मिळवून दिली. दक्षिण कोरियाकडून सन ड्युनने एकमेव गोल केला.टीम इंडियाने अंतिम सामन्यात ५ वेळा विजेत्या दक्षिण कोरियाला हरवून चौथ्यांदा विजेतेपद पटकावले. भारताने २०१७ मध्ये अंतिम सामन्यात मलेशियाला हरवून आशिया कप जिंकला होता. कोरिया दुसऱ्यांदा उपविजेता ठरला.

***

### अजितशेठ नादच केला थेट! कबड्डीच्या मैदानात ऐतिहासिक सिक्स, यु मुंबाचा दणदणीत विजय

मुंबई-प्रो कबड्डी लीगमध्ये यु मुंबाने बंगळुरू बुल्सला धूळ चारली आहे. या सामन्यात यु मुंबाचा रेडर अजित चौहान याने ऐतिहासिक कामगिरी करत एकाच रेडमध्ये तब्बल ६ पॉईंट्स कमावले आहेत. याचसोबत अजित चौहानने कबड्डीच्या इतिहासात एका रेडमध्ये सर्वाधिक पॉईंट्सच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. अजित चौहानच्या या ऐतिहासिक कामगिरीसोबतच यु मुंबाने बंगळुरू बुल्सचा तब्बल ४८-२८ ने पराभव केला आहे.यु मुंबाकडून अजित चौहानने १३, परवेश भैन्सलने ३, सथिश कन्ननने ६, अनिलने ४, रिंकूने ५, लोकेश घोसालियाने ४ आणि रवीने ३ पॉईंट्स केले. तर दुसरीकडे बंगळुरू बुल्सकडून आकाश शिंदेने ३, धीरजने १, आशिष मलिकने ६, अलिरेझाने ६, योगेशने २, दीपक शंकरने ३ पॉईंट्स केले. तर जितेंद्र यादवला १, गणेशाला ३, सत्यप्पाला १ पॉईंट मिळवण्यात यश आलं.बंगळुरूविरुद्धच्या या विजयासोबतच यु मुंबाने पॉईंट्स टेबलमध्येही मोठी उडी घेतली आहे. यु मुंबाने ४ पैकी ३ सामने जिंकल्यामुळे त्यांच्या खात्यात ६ पॉईंट्स झाले आहेत.

***

### १०० रुपयांमध्ये मिळतायत वर्ल्ड कप सामन्यांची तिकिटे, कशी बुक करायची? जाणून घ्या डिटेल्स

मुंबइ-तब्बल १२ वर्षांनी भारतात आयसीसी वनडे महिला वर्ल्ड कपचं आयोजन करण्यात येणार आहे. ३० सप्टेंबर रोजी या स्पर्धेला सुरुवात होणार असून पहिला सामना भारत आणि श्रीलंका संघांमध्ये होईल. यापूर्वी भव्यदिव्य असा उदघाटन सोहळा आयोजित केला जाणार असून प्रसिद्ध गायिका श्रेया घोशाल आपल्या गायनाने सोहळ्याला चारचांद लावेल. आता महिला वर्ल्ड कप सामन्यांच्या ऑनलाईन तिकीट बुकिंगला सुरुवात झाली आहे. आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ चे सर्व सामने भारतात होणार असले तर या स्पर्धेतील हे पाकिस्तानचे सामने मात्र श्रीलंकेत होतील. भारत विरुद्ध पाकिस्तान सामना सुद्धा कोलंबोमध्येच होईल. स्पर्धेतील सर्व सामने एकूण ५ ठिकाणी खेळवले जातील. जर पाकिस्तान अंतिम फेरीत पोहोचला तर विजेतेपदाची लढत देखील श्रीलंकेत होईल.
१०० रुपयात मिळतंय वर्ल्ड कप सामन्याचं तिकीट : महिला वर्ल्ड कपच्या सामन्यांच्या तिकिटांची ऑनलाईन विक्री सुरु झालेली आहे. सर्वात कमी तिकीट फक्त १०० रुपयांना उपलब्ध असल्याने स्टेडियममध्ये चाहत्यांची मोठी गर्दी दिसू शकते.

***

### एक लिटर पेट्रोलपेक्षाही स्वस्त किंमतीत मिळताय वर्ल्ड कप सामन्यांची तिकिटे; कशी करायची बुक?

नवी दिल्ली -आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ सुरु होण्यास फारसा वेळ शिल्लक राहिलेला नाही. भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे या स्पर्धेचे आयोजन करत आहेत. आगामी स्पर्धेतील पहिला सामना ३० सप्टेंबर रोजी खेळवला जाणार आहे. आता स्पर्धा सुरु होण्यापूर्वी क्रिकेट चाहत्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी आली आहे. भारतात होणाऱ्या सर्व लीग सामन्यांच्या तिकिटांच्या किमती १०० रुपयांपासून सुरु होतील. जे की भारतात एक लिटर पेट्रोलपेक्षाही स्वस्त आहे. यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांनाही २०२५ च्या महिला विश्वचषकाच्या सामन्यांचा आनंद घेता येईल.श्रेया घोषाल उद्घाटन समारंभात करणार सादरीकरण : ३० सप्टेंबर रोजी गुवाहाटी इथे भारत आणि श्रीलंका यांच्यातील उद्घाटन सामन्यापूर्वी भारतीय संगीत आयकॉन श्रेया घोषाल महिला विश्वचषकाच्या उद्घाटन समारंभात सादरीकरण करणार असल्याची माहिती आयसीसीनं दिली आहे. तिकिटांच्या किमती खूपच कमी असल्याने या वर्षीची स्पर्धा नवीन पायंडा स्थापित करेल असेही आयसीसीने म्हटले आहे. सामन्यांदरम्यान स्टेडियम भरलेले असावेत अशी आयसीसीची इच्छा आहे. भारतातील सर्व लीग सामन्यांची तिकिटं फक्त १०० रुपयांपासून (सुमारे १.१४ अमेरिकन डॉलर्स) सुरु होतील.

## भारताने कोरियाला ४-१ ने हरवून आशिया कप जिंकला

राजगीर: बिहारमधील राजगीर येथे झालेल्या पुरुष आशिया कप हॉकी स्पर्धेत भारताने कोरियाला ४-१ ने हरवून चौथ्यांदा विजय मिळवला. परिणामी, भारत पुढील वर्षी विश्वचषकासाठी पात्र ठरला.
सुखजीत सिंग, दिलप्रीत सिंग आणि अमित रोहिदास हे भारताच्या स्कोअरशीटवर होते. आठ वर्षांत पहिल्यांदाच कॉन्टिनेंटल स्पर्धेत विजय मिळवताना भारताकडून दिलप्रीतने दोन गोल केले. चौथ्या आणि शेवटच्या क्वार्टरमध्ये सन दैनने कोरियाला सांत्वन गोल केला. जुगराज सिंगला स्कोअरशीटवर येण्याची संधी होती पण त्याचा पेनल्टी स्ट्रोक वाचला.
सुपर ४ मध्ये चीनविरुद्ध ७-० असा विजय मिळवल्यानंतर भारत अंतिम फेरीत पोहोचला. अनेक खेळाडूंनी गोल करण्यात योगदान दिले, अभिषेकने दोनदा गोल केले तर शिलानंद लाक्रा, दिलप्रीत सिंग, मनदीप सिंग, राजकुमार पाल आणि सुखजीत सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला.
भारताने सुरुवातीच्या शिट्टीपासूनच आपले वर्चस्व प्रस्थापित केले, चौथ्या मिनिटाला हरमनप्रीत सिंगने जर्मनप्रीत सिंगला दिलेल्या हवाई चेंडूवर शिलानंद लाक्राने गोल केला. सातव्या मिनिटाला हरमनप्रीत सिंगच्या पेनल्टी कॉर्नर ड्रॅग फ्लिकच्या



विश्वचषकासाठी पात्रता मिळवली

रिबाउंडचा फायदा घेत दिलप्रीत सिंगने आघाडी वाढवली.
दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने आक्रमक दृष्टिकोन कायम ठेवला, हरमनप्रीत सिंग आणि विवेक सागर प्रसाद यांच्यातील सलग खेळानंतर १८ व्या मिनिटाला मनदीप सिंगने गोल केला.
तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने आणखी दोन गोल केले. ३७ व्या मिनिटाला शिलानंद लाक्रा आणि दिलप्रीत सिंग यांच्या सहाय्याने राजकुमार पालने गोल केला. सुखजीत सिंगने ३९ व्या मिनिटाला दिलप्रीत सिंगच्या पासला रूपांतरित करून संघाला ५-० अशी आघाडी मिळवून दिली. अभिषेकने शेवटच्या क्वार्टरमध्ये आणखी दोन गोल केले, ४६ व्या आणि ५० व्या मिनिटाला गोल करून संघाने ७-० असा विजय मिळवला.
सामन्यानंतर कर्णधार हरमनप्रीत सिंगने चीनविरुद्धच्या मागील सामन्यातील संघाच्या सुधारणांवर भर दिला.पाऊस असूनही प्रेक्षकांनी आम्हाला पाठिंबा दिला आणि आमच्या बाजूने उभे राहिले, यामुळे आम्हाला प्रेरणा मिळते, असेही तो म्हणाला. त्याचप्रमाणे संघ प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी देखील आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.
मला वाटले की चीनविरुद्धची ही एक उत्तम कामगिरी होती. आम्ही चांगली सुरुवात केली. पहिला क्वार्टर, पहिला हाफमुळे खेळाचा रंग निश्चित झाला. मी खरोखर आनंदी आहे. आम्ही खरोखर चांगले खेळलो (दक्षिण कोरियाविरुद्धच्या बरोबरीत). पण हा एक उच्च-कार्यक्षमता असलेला खेळ आहे, आम्हाला ते पुन्हा करायचे आहे. भूतकाळातील सर्व काही संपले आहे. आम्हाला ते उद्या पुन्हा तयार करायचे आहे. आम्ही त्याची वाट पाहत आहोत. आम्हाला खेळ खेळायचा आहे, प्रसंग नाही. असे संघ प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले.

## पाकिस्तानचा संघ भारतात येणार नाही

### महिला क्रिकेट विश्वचषक | भारत-पाक सामन्यांबाबत ठरवला नवा नियम | २०२७ पर्यंत भारत-पाक बंदी



नवी दिल्ली: भारतामध्ये होणाऱ्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या उद्घाटन समारंभात पाकिस्तानचा संघ सहभागी होणार नाही. हा समारंभ ३० सप्टेंबर रोजी गुवाहाटी येथे होणार आहे. हा निर्णय भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट संबंधांच्या धोरणाचा एक भाग असल्याचे मानले जात आहे.
हायब्रिड मॉडेलचा वापर
डिसेंबरमध्ये झालेल्या आयसीसीच्या बैठकीनुसार, २०२७ पर्यंत भारत आणि पाकिस्तानचे संघ एकमेकांच्या देशात कोणत्याही स्पर्धेसाठी प्रवास करणार नाहीत. दोन्ही संघांचे सामने त्रयस्थ ठिकाणी खेळवले जातील. याच धोरणानुसार, या विश्वचषकातील पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेतील कोलंबो येथे 'हायब्रिड मॉडेल'वर खेळवले जातील.
पाकिस्तानचे बांगलादेश, इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका या संघांविरुद्धचे सामने कोलंबोमध्ये होतील.
भारत-पाकिस्तान सामन्यांची पार्श्वभूमी
२००८ च्या मुंबई हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील द्विपक्षीय क्रिकेट मालिका पूर्णपणे थांबल्या आहेत. त्यामुळे आता दोन्ही संघ केवळ आयसीसी आणि एसीसी (-िळर उीळलज्ञशीं उेपलळश्र) च्या स्पर्धांमध्येच आमनेसामने येतात. यामुळे अशा सामन्यांना जगभरातील क्रिकेट चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता असते.
२०२३ मध्ये पाकिस्तानचा पुरुष संघ एकदिवसीय विश्वचषक खेळण्यासाठी भारतात आला होता. अहमदाबादमध्ये झालेल्या त्या सामन्यात भारताने पाकिस्तानला ७ विकेट्सने हरवले होते.

## आशिया चषक क्रिकेट स्पर्धतेत कधी होणार भारताचा पहिला सामना ?




अबुधाबी : आशिया चषक टी २० क्रिकेट स्पर्धा मंगळवार ९ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होत आहे. अफगाणिस्तान विरुद्ध हाँगकाँग या सामन्याने स्पर्धेची सुरुवात होणार आहे. भारताचा पहिला सामना बुधवार १० सप्टेंबर रोजी आहे. संयुक्त अरब आमिराती अर्थात यूएई विरुद्ध भारताचा पहिला सामना होणार आहे. आशिया चषक टी २० क्रिकेट स्पर्धेतील सर्व सामने भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होणार आहेत.
आशिया चषक टी २० क्रिकेट स्पर्धेतील भारताचे साखळी सामने (सर्व सामने भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरू होणार)
बुधवार १० सप्टेंबर २०२५ - भारत वि. यूएई - दुबई
रविवार १४ सप्टेंबर २०२५ - भारत वि. पाकिस्तान - दुबई
शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५ - भारत वि. ओमान - अबुधाबी
आशिया चषक टी २० क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघ : सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, रिंकू सिंग

## महाराष्ट्र महिला व्हीलचेअर बास्केटबॉल संघाचे ग्वाल्हेर येथील स्पर्धेत यश

पुणे : ग्वाल्हेर येथील अटल बिहारी वाजपेयी ट्रेनिंग सेंटर फॉर डिसेबिलिटी स्पोर्ट्स येथे नुकत्याच झालेल्या नवव्या राष्ट्रीय व्हीलचेअर बास्केटबॉल अजिंयपद स्पर्धेत महाराष्ट्र महिला व्हीलचेअर बास्केटबॉल संघाने व्हीलचेअर बास्केटबॉलच्या ३३ आणि ५५ आवृत्त्या जिंकल्या आहेत. एक ते चार सप्टेंबर या कालावधीमध्ये या स्पर्धा झाल्या.राष्ट्रीय अजिंयपद स्पर्धेत महाराष्ट्र महिला व्हीलचेअर बास्केटबॉल संघाने जिंकलेले हे सलग पाचवे वे सुवर्णपदक आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील सहा खेळाडूंनी आशिया ओशनिया झोन चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. पुढील आशिया ओशनिया झोन चॅम्पियनशिप ३ ते १६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान बँकॉक येथे होणार आहे.भारतीय पुरुष आणि महिला संघ आशिया ओशनिया झोन चॅम्पियनशिपमध्ये भाग घेणार आहेत.



## महिला विश्वचषकाच्या उद्घाटन समारंभात रंगणार श्रेया घोषालच्या सुरांची मैफील


मुंबई : महिला विश्वचषकातील मोठ्या बक्षीसांची घोषणा केल्यावर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने या स्पर्धेच्या उदघाटन समारंभासंदर्भातील खास माहिती शेअर केली आहे. लोकप्रिय भारतीय गायिका श्रेया घोषालच्या सुरांच्या सुरेल मैफीलीसह महिला वनडे वर्ल्ड कप स्पर्धेचा माहोल खास करण्याचा बेत आखण्यात आला आहे. ३० सप्टेंबरला भारत-श्रीलंका यांच्यातील लढतीसह महिला वनडे वर्ल्ड कप स्पर्धेची सुरुवात होती. ही सलामीची लढत गुवाहटीच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे.
महिला विश्वचषक स्पर्धेच्या सलामीच्या लढतीआधी सुरेल आवाजातील गाण्यांच्या सादरीकरणाशिवाय श्रेया घोषाल आणखी एका खास गोष्टीमुळे या जागतिक महिला क्रिकेट स्पर्धेशी कनेट झाली आहे. भारताच्या यजमानपदाखाली



होणार्या स्पर्धेचे 'ब्रिंग इट होम' हे अधिकृत गाणेही श्रेया घोषालच्या आवाजात रेकॉर्डिंग करण्यात आले आहे. यंदाच्या हंगामातील एकदिवसाची महिला विश्वचषक स्पर्धा ही भारताच्या यजमान पद-ाखाली होणार असली तरी भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीत ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलनुसार खेळवण्यात येणार आहे. पाकिस्तान संघाचे सर्व सामने हे श्रीलंकेतील कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगतील. नवी मुंबईसह भारतातील चार शहरातील मैदानात या स्पर्धेतील सामने खेळवण्यात येणार आहेत. १२ वर्षांनी आयसीसी महिला वनडे महिला विश्वचषक स्पर्धेच यजमानपद भारताला मिळाले आहे. या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडचा दबदबा राहिला असून घरच्या मैदानात हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघ इतिहास रचण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल. भारतीय महिला संघाला चीअर करण्यासाठी स्टेडियमवर जाऊन सामने पाहणार्यांसाठीही एक आनंदाची बातमी आहे. ती म्हणजे या जागतिक स्पर्धेतील भारतीय मैदानात रंगणार्या सामन्यासाठी पहिल्या फेरीतील तिकटांचा दर हा फक्त १०० रुपये इतका आहे. महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी तिकीटांचा दर हा अल्प ठेवण्यात आले आहे.

## महिला टेनिसपटू आर्यना संबालेंका अंतिम फेरीत

बेलारुस : टेनिस जगतातील नंबर महिला टेनिसपटू आर्यना संबालेंका ही कोर्टवरील आपल्या सर्वोत्तम कामगिरीशिवाय सौंदर्यामुळे चर्चेत राहणार्या महिला खेळाडूंपैकी एक आहे. बेलारुसची अव्वल क्रमांकाची महिला टेनिसपटूने अमेरिका खुल्या स्पर्धेतील महिला एकेरीत आपल्या कामगिरीतील सातत्य दाखवून देत अंतिम फेरी गाठली.
वर्षातील अखेरच्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत जेतेपद पटकावण्यासाठी ती अमेरिकेच्या अमांडा अनीसिमोवाविरुद्ध भिडताना दिसेल.अवघ्या २७ वर्षांची असणारी आर्यना सबालेंका हिने आतापर्यंत आपल्या टेनिस कारकिर्दीत २ वेळा ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकली आहे. यंदाच्या विम्बल्डन स्पर्धेत अमांडाकडून उपांत्य फेरीमध्ये पराभूत झाल्यालर तिने काही काळ ब्रेक घेतला होता. आता या पराभवाची परतफेड करण्यासाठी ती कोर्टवर उतरेल.
आर्यना सबालेंकाचा जन्म १९९८ मध्ये बेलारूस येथील मिंस्क येथे झाला, तिचे वडील एक आइस हॉकी प्लेयर होते. २०१३ मध्ये या सुंदरीनं टेनिस कोर्टवरील आपल्या प्रवासाची सुरुवात केली. बेलारूसची टेनिस कोर्टवरील सुंदरी भटकंतीची शौकीन आहे. खेळातील कामगिरीशिवाय सोशल मीडियाच्या माध्यमातून ती हॉट अँण्ड ब्यूटीफूल चाहत्यांना घायाळ करत असते.
सोशल मीडियावरील लोकप्रिय माध्यम असलेल्या इन्स्टाग्रामवर तिने ३४ लाख फॉलोअर्स कमावले आहेत. तिच्या प्रत्येक फोटो अन् व्हिडिओवर चाहते प्रेमाची 'बरसात' करत असतात.
वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी या नंबर वनट महिला टेनिसपटून खेळातील सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर बक्षीस स्वरुपात मिळालेली रक्कम आणि जाहिरातीच्या माध्यमातून जवळपास १४० कोटींहून अधिक कमाई केली आहे. आर्यना संबालेंकाच्या डाव्या हातावर वाघाचा टॅटू आहे. यामुळे तिला द टायगर हे टोपणनाव मिळाले असून ति स्वतःलाही या नावाने संबोधले आहे. सेरेना विलियम्स आणि मारिया शारापोव्हा यांना आदर्श मानणार्या टेनिस स्टारमध्ये खेळात सेरेनासारखा धाक तर लूसमध्ये शारापोव्हाची बात दिसून येते.



# किल्लारीच्या तरूणाचा अमेरिकेत शिवराज्याभिषेक देखावा:डॉ. पोतदार यांनी परदेशातही जपली गणेशोत्सवाची परंपरा, शिवचरित्राला उजाळा



किल्लारी(प्रतिनिधी)- औसा तालुक्यातील किल्लारी येथील अमोल पोतदार या तरुणाने परदेशातही आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि इतिहासाचा गौरवशाली वारसा जिवंत ठेवला आहे. अनेक वर्षांपासून तो पत्नीसमवेत अमेरिकेत वास्तव्यास असून तेथेही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा त्यांनी रुजवली आहे.

अमोल पोतदार हे किल्लारी येथील प्रसिद्ध डॉक्टर अशोक पोतदार यांचे चिरंजीव आहेत. १९९३ च्या भूकंपानंतर किल्लारीकरांच्या आरोग्यासाठी डॉक्टर अशोक पोतदार यांनी केलेले योगदान आजही गावकऱ्यांच्या स्मरणात आहे. त्याच संस्कारांचा वारसा अमोल पोतदार यांनीही परदेशात जपला आहे. अमेरिकेतील भूमीत अमोल पोतदार याने भव्य गणरायाची मूर्ती प्रतिष्ठापित केली असून दरवर्षी गणेशोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. गणेश भक्ती बरोबरच छत्रपती शिवाजी महाराजां विषयीचा अभिमानही त्यांनी जपला आहे.

यावर्षी गणेशोत्सवात शिवनेरी ते रायगड असा शिवकालीन प्रवास उभा करून गड-किल्ल्यांचे अप्रतिम देखावे साकारले आहेत. यात शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म, स्वराज्य स्थापने साठीचा संघर्षमय प्रवास आणि अखेर रायगडावर झालेला राज्याभिषेक या सर्व टप्प्यांना उजाळा देण्यात आला आहे.

अमेरिकेत राहूनही आपल्या मायभूमीच्या संस्कृतीशी असलेली नाळ जपण्याचे काम अमोल पोतदार यांनी केले असून, परदेशात भारतीय परंपरेचे अनोखे दर्शन घडवले आहे. गणराय आमचे दैवत आणि छत्रपती आमचे अभिमान. अमेरिकेतल्या पुढील पिढीला हा वारसा समजावा म्हणूनच आम्ही गणेशोत्सव आणि शिवकालीन गड-किल्ल्यांचा देखावा उभारतो. मायभूमीपासून दूर राहूनही संस्कृतीशी नाळ टिकवून ठेवणे हीच समाधानाची गोष्ट आहे.

# वलांडी येथे मोहम्मद पैगंबरांच्या जन्म दिनानिमित्त दूध, शरबतचे केले वाटप



वलांडी(प्रतिनिधी)- प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिन म्हणजेच जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी हा पवित्र सोहळा वलांडी येथे मोठ्या उत्साहात, श्रद्धेने व आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने गावाच्या मुख्य चौकात भव्य स्टेज उभारण्यात आले होते. सकाळी फातेहा खाणी करून पैगंबरांच्या जीवनकार्याचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या शिकवणुकीतील शांतता, बंधुभाव, प्रामाणिकता आणि मानवतेचा संदेश याचा उल्लेख करत सर्व उपस्थितांना जीवनात हे मूल्य अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाला गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेकडो भाविकांनी श्रद्धेने सहभाग घेतला. उपस्थित भाविकांसाठी शरबत वाटपाची सोय करण्यात आली होती. गावातील युवकांनी आनंदाने व सेवाभावाने सहभाग नोंदवत प्रत्येकाला शरबत वाटप केले. यामुळे सामाजिक सलोखा, बंधुभाव व ऐक्याची जाणीव सर्वांना झाली. यावेळी असद पठाण, हकीम बौडीवाले, माहमुद तांबोळी, गौस तांबोळी, मुस्ताक कादरी आदी उपस्थित होतेया धार्मिक सोहळ्याचे यशस्वी आयोजन गावातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन केले.

# संभाषण कौशल्यातून विद्यार्थ्यांचा होईल विकास:महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या लिटरेरी असोसिएशनचे उदघाटन

उदगीर(प्रतिनिधी)- संभाषण अशी कला आहे की, ज्यामुळे मनुष्य दुसऱ्याच्या जवळ जातो आणि एकमेकांशी आत्मीय संबंध प्रस्थापित करू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संभाषणकला आत्मसात करून आपला सर्वांगीण विकास घडवून आणावा, असे विचार श्री हावगीस्वामी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातील प्रा. ज्योती संपाळे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने लिटरेरी असोसिएशनच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, प्रा. मनोहर पटवारी, प्रा. डॉ. संजीव सूर्यवंशी तसेच प्रमुख वक्ते म्हणून प्रा. ज्योती संपाळे उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. डॉ. संजीव सूर्यवंशी म्हणाले , भाषेचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि मानसिक विकासाला चालना देते. जीवनात यशस्वी होण्यासाठी भाषेचे आकलन आवश्यक आहे. लिटरेरी असोसिएशनमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषेची गोडी निर्माण होऊन भाषेविषयीची संकल्पना, शब्दांची जडणघडण आणि अभिव्यक्तीशैलीची जाणीव होते. प्रमुख वक्त्या प्रा. संपाळे म्हणाल्या की, इंग्रजी भाषा आणि त्यातील संवादकौशल्य याला देश-विदेशात मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. उच्च शिक्षण असो वा नोकरीच्या संधी, इंग्रजी संभाषणात प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना यशाचे नवे दरवाजे उघडतात. मार्गदर्शनपर भाषण करताना प्रा. मनोहर पटवारी म्हणाले की, ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने इंग्रजी भाषेतील संवादकौशल्य वृद्धिंगत करणे शक्य आहे. त्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन घेऊन विद्यार्थी सातत्याने प्रयत्नशील राहावेत. सूत्रसंचालन प्रा. एस. एल. शेख यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. शिवनंदा रोडगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. राजा मुदुडगे आणि प्रा.विजयालक्ष्मी प्रसन्ने यांनी परिश्रम घेतले.

प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के म्हणाले की, भाषा ही माणसाला जिवंत ठेवते आणि मनुष्यत्वाला आकार देते. भाषेच्या सखोल अभ्यासामुळे जीवन अधिक अर्थपूर्ण होते. संवादकौशल्य व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम करते. त्यामुळे इंग्रजी भाषेतील संवादकौशल्य आत्मसात करून विद्यार्थी भविष्यातील अनेक संधी मिळवू शकतात, असे त्यांनी सांगितले.



# डीजेमुक्त मिरवणुका, ४१ गावात जल्लोषात बाप्पांना निरोप



अहमदपूर प्रतिनिधी)- अहमदपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ४१ गावांमध्ये एकूण ९४ गणेश मूर्तींचे विसर्जन अत्यंत शांततेत आणि कोणत्याही डीजेच्या गजराशिवाय पार पडले. पोलीस आणि स्थानिक गणेश मंडळांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हे यश मिळाले असून, त्यामुळे ध्वनी प्रदूषण आणि सार्वजनिक शांततेला कोणताही धोका निर्माण झाला नाही.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर उपअधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बी.डी. भुसनुर यांनी गणेश मंडळांना गणेश मूर्तींचे विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने आणि पारंपरिक धार्मिक व सांस्कृतिक वाद्यांचा वापर करून करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामीण भागातील गणेश मंडळांनी सहकार्य केले.

यामुळे सर्व विसर्जन मिरवणुका शांतता आणि सुव्यवस्थेचे वातावरण कायम ठेवून पार पडल्या. अहमदपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोणत्याही गावात डीजेचा वापर करण्यात आला नाही, ज्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

या यशस्वी आणि शांततापूर्ण विसर्जनासाठी पोलिसांनी सर्व गणेश मंडळांचे आणि गावकऱ्यांचे आभार मानले. नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी दिलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला, असेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमाने अहमदपूर तालुक्यात सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

अहमदपूर तालुक्यातील नांदुरा बुद्रुक येथे यंदा श्री संत नामदेव कृपा नवयुवक गणेश मंडळाने पर्यावरणपूरक आणि पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करत एक आदर्श घालून दिला आहे.

मंडळाने डीजे व ध्वनीप्रदूषण करणाऱ्या कोणत्याही उपकरणांचा वापर टाळून टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात गणेश विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात पार पाडला. यंदाच्या गणेशोत्सवात मंडळाने केवळ गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यावर भर दिला नाही, तर त्यासोबतच अनेक सामाजिक उपक्रम राबवले. यामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचा विशेष उल्लेख करावा लागेल. या उपक्रमातून त्यांनी पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, विविध समाजप्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करून गावातील तरुणाईला सकारात्मक दिशा दिली. गणेश विसर्जनाच्या दिवशी मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचे डीजे किंवा कर्णकर्कश ध्वनी निर्माण करणारे वाद्य वापरण्यात आले नाहीत. त्याऐवजी, सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन पारंपरिक टाळ -मृदंगाच्या गजरात आणि ''गणपती बाप्पा मोरया''च्या जयघोषात गणरायाला निरोप दिला.

हंडरगुळी परिसरात पर्यावरणाच्या हितासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याचे नुकसान होऊ नये. म्हणुन वाढवणा पोलिसांनी केलेल्या आवाहनाला हंडरगुळी सह ठाण्याच्या हद्दीतील गणेश मंडळाकडून भरभरुन व चांगला प्रतिसाद मिळाला आणि यंदा डीजे व लेसर लाईट वापराला फाटा देत बाप्पांचे विसर्जन केले. डीजे व लेसर लाईटच्या वापरावर जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी कायद्याने बंदी आणली.तसेच विविध पोलिस ठाण्यातील प्रमुखांना डीजेवर कारवाई करण्याचे अधिकार दिले. सपोनि सुनील गायकवाड,हंडरगुळी बीट प्रमुख संजय दळवे-पाटील यांनी हद्दीतील गणेश मंडळांच्या पदाधिका-यांना व डीजे चालकांना कारवाईची माहिती दिली आणि पारंपारिक वाद्यच वाजवायचे आवाहन केले. मंडळाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनेक गणेश मंडळाने गणेशोत्सवासारख्या सार्वजनिक कार्यक्रमातही सामाजिक भान राखत पर्यावरण संरक्षण आणि शांतता राखण्याचा संदेश दिला आहे. नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी दिलेल्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला, असेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमाने अहमदपूर तालुक्यात सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मंडळाने ९ व्या दिवसांच्या गणरायाला पारंपरिक वाद्यांच्या गजरात निरोप दिला. यावेळी श्री विसर्जन मिरवणुकीत बालगोपाळ, महिला यांनीही मोठा सहभाग नोंदवला.

# लातूरच्या पूर्व भागात नाले नसल्याने रस्त्यावर पाणी: वर्षापूर्वी नळांची जोडणी, पण अद्याप मिळाले पाणी नाही, अंतर्गत रस्त्यांची दूरावस्था असल्याचे लक्ष देण्याचे आवाहन

लातूर (प्रतिनिधी)- जिल्ह्यात २७ ऑगस्ट रोजीच्या रात्रीपासून पडणाऱ्या पावसाने २८ ऑगस्ट पर्यंत सातत्य ठेवले असून निम्या जिल्ह्यात म्हणजे ३५ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली होती. जिल्ह्यात दोन दिवसात १५५ मिमी पावसाची नोंद झाली होती. लातूर शहरातही असाच पाऊस पडला असून सखल भागात राहणाऱ्या नागरिकांना याचा अधिकतम त्रास करावा लागला. या सखल भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये सर्वाधिक कामगार, कष्टकरी आहेत. झोपडपट्टी भाग अधिक असल्याने येथे मुबलक सुविधांचा अभाव आहे.

गेली १५ ते २० वर्षासून सखल भागात लोकवस्ती वाढली आहे. परंतू, मूलभूत सुविधांचा अभाव आहे. याकडे प्रशासनाने लक्ष दिले नसल्याचे येथील नागरिकांनी सांगितले आहे. अनेकदा निवेदने, आंदोलने करूनही जशीच्या तशी परिस्थिती असल्याचे नागरिकांकडून स्पष्ट केले जात असून वास्तवात तशी परिस्थिती निदर्शनास आली आहे. या भागात अद्याप नाले बांधण्यात आल्या नाहीत. ये जा करण्यासाठी रस्ते पक्के रस्ते नाहीत. पथदिवे बंद अवस्थेत आहेत. याशिवाय मूलभूत गरजेत येणाऱ्या पाण्याची सोय महानगर पालिका प्रशासनाने केली नसल्याचे चित्र आहे. नागरिकांना अक्षरशः अर्धा किलो मीटर वरून पाणी आणावे लागत आहे, अशी परिस्थिती लातूर शहरात आहे. नागरिकांकडून प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे सांगितले जात असून असंतोष व्यक्त होत आहे.

या भागात साचते पाणी, नागरिकांना होतोय त्रास विजय नगर, जय नगर, अब्दुल कलाम नगर, सय्यद नगर, बुऱ्हाण नगर, मातंगराज नगर, सिद्धेश्वर नगर, संजय नगर, विलास नगर, राजू नगर, म्हाडा कॉलनी, आर्वी गायरान आदी सखल भागात पावसाचे पाणी साचले. येथे अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था, नाल्या नसल्याने ये, जा करताना अडचण आली. अद्याप येथील पाणी हटले नाही. याकडे प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे.

नाल्या नसल्याने अडचण या परिसरात साडेनऊशे घरे आहेत. येथे वर्षापूर्वी दिलेल्या नळांना अद्याप पाणी येत नाही. अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली असून येथे रस्ते करण्याची गरज आहे. रस्त्यावर खड्डे पडले आहेत. नाल्या नसल्याने सर्व सांडपाणी रस्त्यावरील खड्ड्यात साचते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आम्ही नळेगावकरच्यावतीने दोनशे एक वृक्षांचे वाटप; उपक्रमाचे हे दहावे वर्ष

**नळेगाव/अजगर मजकुरी :** नळेगाव येथील आम्ही नळेगावकर या पर्यावरणस्नेही समुहाच्या वतीने उकाचीवाडी नळेगाव येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण व वृक्ष वाटप कार्यक्रम राबविण्यात आला.नारळ,आंबा,पेरु, लिंबू, जांभूळ, सीताफळ इत्यादी फळांच्या दोनशे एक मोठ्या रोपट्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगत युवा शेतकरी गंगाधर बोळेगावे तर व्यासपीठावर बाबुराव हुडगे, त्र्यंबक बोळेगावे , शंकर हुडगे,भानुदास हुडगे, व्यंकटराव फरकांडे, बालाजी मोरकांडे,गुंडेराव हुडगे, प्रा निळकंठ बोळेगावे, पंडित मोरकांडे, चंद्रकांत हुडगे, प्रा संजीव पाटील, चंद्रकलाताई बोळेगावे,



सतिश बोळेगावे , दयानंद हुडगे,बंडु मोरकांडे, संतोष हुडगे, अंगद हुडगे, आदि मान्यवर उपस्थित होते.आम्ही नळेगावकर समुहाच्या वतीने दहा वर्षांपासून दरवर्षी वृक्षारोपण व वृक्ष वाटप कार्यक्रम राबविला आहे. यापूर्वी नळेगाव, लिंबळवाडी, आटोळा, तिवटघाळ, येलमवाडी, सावंतवाडी या गावातील वृक्षारोपण उपक्रमात आम्ही नळेगावकर समुहाने सक्रिय सहभाग नोंदविला आहे. आजच्या वृक्ष वाटप कार्यक्रमात शिक्षक दिनानिमित्त आदर्श शिक्षिका दिपाताई गुळवे, इंदुमती डोंगरे, शंकर स्वामी, प्रमोद हुडगे यांचा सत्कार करण्यात आला. शंभर वर्षे वयाच्या रत्नाबाई अण्णाराव हुडगे, आदर्श शिक्षिका दिपाताई गुळवे, आदर्श ग्रामसेवक चंद्रकांत हुडगे व गावातील विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व समन्वयक प्रमोद हुडगे, डॉ अरुण भालेकर, डॉ अनिल ढोले,डॉ प्रशांत शिरुरे, डॉ चंद्रशेखर ढोले, शंकर स्वामी, राजेंद्र सावंत,अभिजित पाटील, कैलास चव्हाण,गुंडेराव ढोले, शैलेश रेड्डी, पप्पू सावंत,गौतम गायकवाड, दत्तात्रय राजमाने,अतुल हुडगे, गजानन हुडगे, सुरेश बोळेगावे, संदीप मोरकांडे,परमेश्वर मोरकांडे, कुमार बोळेगावे, भरत हुडगे, अमर शंकर पाटील, दयानंद बापुराव हुडगे, चरपटनाथ गणेश मंडळाचे अध्यक्ष अतुल हुडगे व सर्व पदाधिकारी आदींनी पुढाकार घेतला.

## जशने ईद ए मिलादुन्नबी निमित्त भव्य रक्तदान शिबिर,५८ रक्तदात्यांनी रक्तदान केलं

लातूर:- जशने-ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त जुल्फेकार यंग बॉईज बरकत नगर यंग बॉईज केजीएन यंग बॉईज व माजी नगरसेवक इम्रान भाई सय्यद यांच्या पुढाकारणे लिज्जत पापड कारखाना,सारा चौक येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले या रक्तदान शिबिर मध्ये ५८ लोकांनी रक्तदान करून एक चांगल्या सामाजिक कामाला साथ दिली.. या शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून जुलूस कमिटीचे २०२५ चे अध्यक्ष रिजवान कुरेशी,सलीम गोलंदाज,अलीम शेख,मा. नगरसेवक सचिन बंडापल्ले, शैलेश बोईनवाड,युसूफ सय्यद,समीर शेख,निजाम शेख,सादिक सय्यद,इरफान शेख, वैदूद्दीन शेख,शीलाताई वाघमारे,मोईन शेख,सरफराज सय्यद,परवेज सय्यद ,इस्माईल शेख,सोहेल शेख,इम्रान गोंदरीकर,नजीर शेख,कासिम शेख,जिया काझी,अरफात पटेल,रफिक शेख,सुरज सूर्यवंशी,जगन्नाथ सूर्यवंशी,इरफान सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते..

# नळेगावच्या प्रकाश शेटे इंग्लिश पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा

**नळेगाव/अजगर मजकुरी :** डॉ. एस. एम. जगदे यांची एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली. काही दिवसांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातर्फे प्राचार्य पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या होत्या. सर्व निकषांवर पात्र ठरलेल्या डॉ एस एम जगदे यांना विद्यापीठाने मान्यता दिली व बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संचालक मंडळाने त्यांची प्राचार्य पदी नियुक्ती केली. याबद्दल नुकतेच महाविद्यालयांमध्ये नवनियुक्त प्राचार्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर,



सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री राजेश्वर बुके, श्री बस्वराज येरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ. ललितताई पांढरे, श्री बाबुराव तरगुडे, परिसर संचालक डॉ मोहन बुके, माजी प्राचार्या डॉ सौ ज्योती पाटील, उपप्राचार्य प्रा विरभद्र बाळे उपस्थित होते. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.या वेळी मान्यवरांची समयोच्चित भाषणे झाली.

या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. एस. एम. जगदे यांनी महाविद्यालयाची भविष्यात अधिकाधिक प्रगती होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सुचित केले. हे महाविद्यालय संपुर्ण महाराष्ट्रात नावारूपास यावे या साठी सर्वांनी परिश्रम करण्याची गरज असल्याचे नमुद केले.

सर्व संचालक मंडळाने त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व संपुर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सर्व विभाग प्रमुख प्राध्यापक व कर्मचारी यांनीही नवनियुक्त प्राचार्यांचे अभिनंदन व स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व संपुर्ण सहकार्य करण्याचे वचन दिले.

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांचा राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना पाठिंबा; शिष्टमंडळाने घेतली भेट

लातूर प्रतिनिधी,: राष्ट्रीय आरोग्य अभियानातील विविध मागण्यांसाठी १९ ऑगस्टपासून काम बंद आंदोलन सुरू केलेल्या कर्मचाऱ्यांनी, राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समिती आणि एकता संघाच्या शिष्टमंडळामार्फत राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची बाभळगाव निवासस्थानी भेट घेतली. मागण्यांसंदर्भात त्यांना निवेदनही सादर केले.

यावेळी आमदार अमित देशमुख यांनी या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना आपला पाठिंबा असल्याचे सांगितले. तुमच्या न्याय्य मागण्या शासनाने त्वरित मंजूर कराव्यात यासाठी मी पाठपुरावा करेन, असे आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिले. १० वर्षांपेक्षा अधिक काळ सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करण्याचा निर्णय ८ मार्च २०२४ रोजी घेण्यात आला होता, मात्र १८ महिने उलटूनही त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी सेवेत कायम करणे, मानधन वाढवणे, ईपीएफ (एझत्र), बोनस आणि बदली धोरणाबाबत निवेदनातून मागण्या केल्या आहेत. या शिष्टमंडळात ओमप्रकाश सोनवणे, अबरार मोसीन, संगीता डवरे, पांडूरंग मुळे, शहाजी गायकवाड, पुजा पाटील यांच्यासह डॉक्टर्स, नर्सेस, आरोग्यसेविका, आरोग्य सेवक, समन्वयक, सहाय्यक आदी उपस्थित होते.

# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी विविध संस्था, संघटना पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या घेतल्या भेटीगाठी, साधला संवाद

लातूर प्रतिनिधी: राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी रविवार दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटना,काँग्रेस पक्ष महाविकास आघाडी मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांच्या भेटगाठी घेत त्यांच्याशी संवाद साधला त्यांच्या अडीअडचणी,समस्या समजून घेऊन त्यांची निवेदने, निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.दरम्यान प्रभागातील विकास कामाच्या संदर्भात अग्रोया नगर भागातील नागरिकांच्या शिष्टमंडळाने आमदार अमित देशमुख यांची भेट घेतली. तसेच अल्पसंख्याक आवाज या वर्तमान पत्राच्या पुरवणीचे प्रकाशन देखील यावेळी त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी आमदार, व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, माजी चेअरमन धनंजय देशमुख, सचिव अरविंद पाटील, जिल्हाध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, श्रीशैल उटगे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सर्जेराव मोरे, विलास सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन रवींद्र काळे, व्हाईस चेअरमन प्रवीण पाटील, चंद्रकांत टेकाळे, गोविंद मोरे, अनंत बारबोले, बादल शेख, मदन भिसे, लक्ष्मण मोरे, गोविंद बोराडे, उमेश बेद्रे, व्यंकटेश पुरी, फारुख शेख, विजय टाकेकर, लातूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, लातूर जिल्हा काँग्रेस ओबीसी विभागाचे अध्यक्ष एकनाथ पाटील, लातूर आडत असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते.

लातूर उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीमधील पदाधिकारी, आडते, व्यापारी व इतर घटकांच्या शिष्टमंडळाने सकाळी आमदार अमित देशमुख यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्या समवेत मार्केट कमिटीच्या परिसरातील विविध अडीअडचणींवर चर्चा झाली. आमदार देशमुख यांनी सर्व समस्या समजून घेत त्या सोडवण्यासाठी संबंधितांना योग्य त्या सूचना केल्या.

विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी कारखाना, विलास सहकारी साखर कारखाना, रेणा सहकारी साखर कारखाना यांसह 'मांजरा परिवार'तील विविध संस्थांचे पदाधिकारी व इतर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार अमित देशमुख यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.

लातूर शहर तसेच जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांनीही आमदार अमित देशमुख यांची भेट घेतली. त्यांनी आपल्या अडचणी व समस्या आमदार देशमुख यांच्यासमोर मांडल्या. या सर्व समस्या सोडवण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या जातील आणि आवश्यक ठिकाणी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन आमदार देशमुख यांनी यावेळी दिले.

## मिरवणूक सैराट ..

मिरवणूक जल्लोष
अ वर्णनीय तो थाट
गुलालात रंगे सगळे
उसळे उत्साही लाट

अडतेऋग्णवाहिका
कशीबशी काढेवाट
ऋग्ण ते अत्यावस्थ
यम राज पाही वाट

खिसेकापू चोर जोर
गुन्ह्यांचा सुळसुळाट
कमाई क्षणार्धे साफ
लावतात पुरती लाट

जोडेतुटे कपडे फाटे
धुसमुसळी बसे चाट
अश्लील चाळे चाले
घुमे वासनांध पिसाट

जादुची हातचलाखी
पराक्रम दावे अचाट
संधी शोधे संधीसाधू
ते दंगलखोर मोकाट

छेड छाड धुडूम् धाड
मातलेउलथले सैराट
कसेकरायचे नियंत्रण
गडबड गोंधळ विराट

पळवूनेती लहानग्या
शक्कल काढे भन्नाट
पवित्र या सोहळ्यास
लागले गालबोट नाट

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# हैदराबाद गॅझेट लागू करण्यासाठी कोळी महादेव समाजाचा एल्गार मेळावा



**निलंगा आयुब:-बागवान** मराठवाड्यातील आदिवासी कोळी महादेव, कोळी मल्हार जमातीसाठी हैदराबाद गॅझेट लागू करणेसाठी दादगी ता. निलंगा येथे कोळी महादेव समाजाचा एल्गार मेळावा रविवारी ता. ७ रोजी पार पडला. यावेळी मेळाव्यात हैदराबाद गॅजेट लागू करण्यासाठी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मराठवाड्यातील जिल्ह्यात धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सकल आदिवासी कोळी महादेव जमातीचे नेते चंद्रहास नलमले यांच्या नेतृत्वाखाली हा एल्गार मेळावा झालाफ या मेळाव्यात आदिवासी कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी ढोर, टोकरे कोळी व डोंगर कोळी यांना १९५० पूर्वीचा 'कोळी' नोंदीचा रहिवासी पुरावा ग्राह्य धरून अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळावे, मराठवाड्यातील आदिवासी कोळी महादेव, कोळी मल्हार जमातीसाठी हैदराबाद गॅझेट लागू करावे यासह विविध मागण्यासाठी या गेल्या वर्षभरापासून जलसमाधी आंदोलन, लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुंडन आंदोलन, निलंगा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला या सरकारला सद्बुद्धी देण्यासाठी दंडवत आंदोलन त्यानंतर नऊ दिवस अन्नत्याग उपोषण अशी वेगवेगळी आंदोलन या समाजाने लातूर जिल्ह्यामध्ये केली आहेत. शिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लातूर जिल्ह्यावर असतानाही त्यांना निवेदनही देण्यात आले परंतु आजपर्यंत या समाजाचा प्रश्न सुटला नाही

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु १७ सप्टेंबर १९४८ ला मराठवाडा (निजाम राज्य ) भारतामध्ये समाविष्ट झाला. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात महादेव कोळी व मल्हार कोळी ह्या दोन जमाती प्रामुख्याने राहतात त्यांचे वास्तव्य बालाघाट पर्वतरांगा, नळदुर्गचा भाग, गोदावरी नदीचा दक्षिण भाग असा स्पष्ट समावेश निजाम गॅजेटमध्ये आहे. राज्य शासनाने मराठा समाजाला नुकतेच हैदराबादचे गॅजेट लागू केले आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षापासून मराठवाड्यातील कोळी महादेव व मल्हार कोळी या समाजाकडून हैदराबाद गॅझेटमधील सर्व शासकीय दस्तऐवजांचे अवलोकन केले असता 'कोळी महादेव व कोळी मल्हार' या जमातीचे मूळ वस्तीस्थान हे तत्कालीन हैदराबाद (निजाम) राज्यातील म्हणजेच आताच्या मराठवाड्यातील बालाघाट- महादेव व अजिंठा डोंगर रांगा असल्याचे सिद्ध होते. तसेच हैदराबाद राज्यात म्हणजेच आताच्या मराठवाड्यात कोळी ही मुख्य जमात आहे. कोळी महादेव व कोळी मल्हार या दोनच जमाती या भागात आढळतात असा स्पष्ट उल्लेख आहे.

मराठवाड्यातील मराठा समाजासाठी महाराष्ट्र सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करून कुणबी, मराठा-कणबी प्रमाणपत्र देण्याचा शासन निर्णय काढला आहे. तसाच निर्णय राज्य सरकारने कोळी महादेव व कोळी मल्हार जमातीसाठी लागू करावा अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्या पूर्ण नाही झाल्यास १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे धरणे आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

## टि सी हरवली आहे

साकीब खय्युम पटेल या नावाची इ.१२ वी पास असलेली महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालय निलंगा.ची टी .सी लातूर ते निलंगा बस प्रवासात हरवले आहे कोणास सापडल्यास संपर्क करावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल...
संपर्क - साकीब खय्युम पटेल
दत्त नगर निलंगा
मोबाईल - ८४५९५१३०४३

## टि सी हरवली आहे

श्रद्धा व्यंकटराव काळे रा. हुडगेवाडी ता. चाकुर जि. लातूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रापका ता.शिरुर अनंतपाळ या शाळेची बारावी पासची टीसी हरवली आहे. आणून देणाऱ्यास योग्य बक्षीस दिले जाईल.
-संपर्क ७० ३८ ९४ २१८५

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६